MAHMAR/19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.
दिशा

वर्ष अकरावे / अंक ७ / जून २०१०

## संपादकीय

# शिक्षणाचा सावळागोंधळ - शेवटाची सुरुवात

दिशाच्या एप्रिल २०१० च्या अंकात मोफत आणि सक्तीच्या शिक्षणविषयक नवीन कायद्याबद्दल आम्ही संपादकीय लिहिले होते. या, म्हणजेच जून महिन्यात शाळा सुरू होतात; म्हणूनच वृत्तपत्रांची मुखपृष्ठे या 'क्रांतिकारक' कायद्यासंदर्भातील शीर्षके छापून सजू लागली आहेत.

सकाळ वृत्तपत्राचे १४ जूनचे शीर्षक होते, ''नापास न करणाऱ्या शिक्षणाचे पर्व आजपासून'' खरे म्हणजे, हे शीर्षक 'दिवाळखोर शिक्षणाचे पर्व आजपासून' असे असायला हवे होते. कोणत्याही व्यवस्थेत बदल आणि सुधारणा अपरिहार्य असते आणि म्हणून आपल्या शिक्षणातही कालानुरूप बदल होणे अपेक्षितच आहे. पण यामध्ये शिक्षण विषयक मूलभूत संकल्पना आणि शिक्षणासंदर्भात उपलब्ध होणाऱ्या साधनांचा वापर, त्यांच्या उपयोगाकरता लागणाऱ्या आर्थिक तांत्रिक बाबींचे नियोजन या बाबी वेगळ्या आहेत, याचे भान हवे.


लोकमान्य टिळकांनी 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, व तो मिळवणारच' असे म्हटले होते. यामधील अभिप्रेत अर्थ तत्कालीन परिस्थितीत इंग्रजांच्या आपल्यावरील वसाहतीच्या अधिकारासंदर्भात होता. भारतीयांना किंवा तत्सम मानवी समूहांना त्यांच्या भौगोलिक कक्षांच्या अंतर्गत आपले सर्व व्यवहार चालवण्याचे स्वातंत्र्य कोणी दिले म्हणून अस्तित्वात नसते; तर ते मूलभूत असते असा गर्भित अर्थ या वाक्यात होता. अर्थातच, ब्रिटिशांना भारतावर राज्य करण्याचा कुठलाही कायदेशीर व नैतिक अधिकार नाही हे त्यात अभिप्रेत होते. म्हणजे माणसाचे काही मूलभूत, जन्मजात, स्वयंसिद्ध नैसर्गिक अधिकार असतात. आपापल्या सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक, भौगोलिक परिस्थितीशी सुसंगत अशी अभिव्यक्ती करण्याचा अधिकार हाही त्याच स्वातंत्र्याचा एक भाग असतो. आईवरील मातृभूमीवरील प्रेम हा त्या जन्मसिद्ध अधिकारांचा भाग असून, तो कोणी प्रदान केला म्हणून मिळत नसतो. या अधिकारांची मशागत करणे, त्यांत परिपक्वता आणणे आणि तो अधिकार सुसह्य जीवनाकरता अर्थपूर्ण बनवणे हा जीवनातील संस्कारांचा भाग असतो.

घटनेने शिक्षणाचा अधिकार दिला, या इतका खोटेपणा दुसरा कोणताही असू शकत नाही. सर्व आघाड्यांवर दिवाळखोरी माजवल्यावर समाजाला आपण काहीतरी बहाल करत आहोत असली सरंजाम प्रवृत्ती यातून व्यक्त होते.

(पृष्ठ क्रमांक ४० वर)

# स्वप्न साकारत आहे...

*(१ ऑगस्ट हा आमच्या विद्या प्रसारक मंडळाचा स्थापना दिन. त्या निमित्ताने)*



*हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,*
*हे स्वप्न नव्हे महंमदी मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे*
*हे स्वप्न नव्हे खुशालवंतांचे, नव्हे ते आरामितांचे*
*नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावतांचे*
*ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,*
*सदा ध्येयध्यासीं मग्न त्यांचे !*
*हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,*
*ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे*
*हे स्वप्न न दिसे एका क्षणीं, न एका दिनीं,*
*न एके यामिनी*
*दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्रानाशही तें करी !*
*हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले*
*ते असे, भव्यता जयाची महान, सीमा जयाची अस्मान !*
*हे स्वप्न जसे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,*
*मुदित मनीं सुस्वागत अपुलें करितां*
*स्वप्न दिसे साकारले*
*आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा –*
*ओसाड भूमी कर्दमीं जिथे घाण*
*द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान*
*ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,*
*दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न जया कल्पिला.*
*भव्य वास्तू इथे साकारती, दृश्य जयाचें महान,*
*शिल्पही जयांचे विशेषज्ञान देखिती*
*मनी जे सुजाण,*
*दृश्य देखतां जाणवे भव्यता, प्रासाद जणूं सरस्वतीचा,*
*ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,*
*बगीचे जिथे बहरती फुलाफुलांचे रंगरंगती,*
*उद्यानीं बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.*
*युवायुवतींचे मग्न घोळके, स्वप्न रंगवितां मग्न जे मानसी*
*स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई*
*आचार्य आणि प्राचार्य, सदा इथें रंगती*
*विज्ञानसत्रीं सदा जयांची वाहिली मती,*
*कलावंत, सरस्वतीचे तन्मणी, तसे वैज्ञानिक महान्,*
*इथे जन्मती प्रतिभा जयांची देदीप्यमान*
*भूदल–सागर–सैनिक, वायुपुत्रही इथे निर्मिती*
*शक्तियुक्ति जयांची भारतमातेप्रती*
*नवमानव, नवनागरिक, प्रयत्नीं इथे घडतसे*
*सत्य, शिव, सुंदर जयांचे अणुरेणीं वसे.*
*बालके तव शिशुमंदिरी दाखल होतां,*
*विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां*
*नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार*
*स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार*
*नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,*
*बुद्धि जयाची, शक्ति जयाची भारतभूचा ठेवा*

*– डॉ. वा. ना. बेडेकर*




**वर्ष अकरावे / अंक ७/ जून २०१०**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १५ वे/अंक १२ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | Will अर्थात मृत्युपत्र | सौ. जान्हवी नवरे,<br>सौ. प्रज्ञा राजेबहादूर | ३ |
| २) | उत्तररामचरित्‌कर्ता भवभूति | सौ. सुनीता जयंत खरे | ६ |
| ३) | 'झुंड' : दोन संस्कृतीतील सनातन झगडा | डॉ. प्रदीप कर्णिक | ११ |
| ४) | दिल्ली, आग्रा, मथुरा, वृंदावन, वैष्णवदेवी | श्रीमती आशा भिडे | २० |
| ५) | श्रीमत् आद्य शंकराचार्य प्रणित अपरोक्षानुभूति संक्षिप्त गोषवारा | श्री. शं. बा. मठ | २५ |
| ६) | भारतीय संस्कृती – बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | ३० |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | ३६ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा आणि स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून, संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

दूरदर्शन, सिनेमे व सवंग नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**<u>या मासिकाचे वर्गणीदार होऊन, या मासिकात जाहिरात देऊन किंवा लेख पाठवून आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !</u>** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा
**विद्या प्रसारक मंडळ,**
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**टीप** : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) **''विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा''** या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

अंकाची किरकोळ
<u>विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.</u>

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, टपाल सूची क्रमांक (पिनकोड नंबर) व दूरध्वनी क्रमांक कळवावा.

# Will अर्थात मृत्युपत्र

*'मरणोत्तर आपल्या अर्जित संचिताचे काय?' हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात असू शकतो. त्या दृष्टीने मृत्युपत्रासंदर्भातील अतिशय उपयुक्त माहिती देणारा हा लेख - संपादक*

मन हे एक न उलगडणारे कोडे आहे असे म्हणतात. त्याचं समर्पक वर्णनही बहिणाबाईंनी आपल्या कवितेत केलेलं आहे. अशा या चौफेर वावरणाऱ्या मनाने वर्तमानात वावरणं म्हणजे महाकठीण.

व्यक्ती तितक्या प्रकृती या न्यायाने प्रत्येकाचं मन कोणत्या ना कोणत्या गोष्टीसाठी हळवं असतं. स्वत:च्या मालमत्तेविषयी मन हळवं असणाऱ्यांचीही संख्या लक्षणीय आहे. माझ्यानंतरही माझ्या मालमत्तेचं संरक्षण होईल का? तिचे व्यवस्थापन उत्तम रीतीने होईल का? ती लयाला तर जाणार नाही ना? त्यावरून भांडण-तंटे तर होणार नाहीत ना? परिस्थितीनुरूप असे अनेक प्रश्न त्यांना भेडसावत असतात. अर्थात् काळाच्या पुढे धावणे हा मनाचा किंवा मनुष्याचा स्वभावधर्मच। त्यामुळे असे न वाटले तरच नवल।

म्हणूनच मरणोत्तर आपल्या संपत्तीचे इच्छेनुरूप वाटप करण्यासाठी बनवला जाणारा ऐवज, ज्याला कायदेशीर भाषेत will अथवा मृत्युपत्र म्हणतात, त्यासाठी कायद्यात सामान्यत: काय तरतूद आहे ह्या उद्देशाने या लेखाचा प्रपंच। या कायद्याची सखोलता या लेखात चर्चिलेली नाही.

आपल्या मालमत्तेची मृत्यूनंतर होणारी विल्हेवाट याबाबतच्या इच्छेची विधिवत घोषणा मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीने करणे, म्हणजेच मृत्युपत्र. याबाबतचे नियम भारतीय वारसा कायदा १९२५ (Indian Succession Act, 1925) यावर आधारित आहेत. कोणत्याही स्थिरचित्त (sound mind) सज्ञान (वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या) व्यक्तीस मृत्युपत्र करता येते. जर त्या व्यक्तीस मालमत्तेत मर्यादित हक्क असतील, तर त्या व्यक्तीस त्या मर्यादेपर्यंतच आपले मृत्युपत्र करता येईल. मृत्युपत्राद्वारे संपत्ती या व्याख्येत बसणाऱ्या सर्व संपत्तीचे वितरण करता येते. यात ज्या व्यक्तीला मृत्युपत्रान्वये संपूर्ण किंवा अंशत: मिळकत द्यावयाची असेल अशी व्यक्ती वारस असलीच पाहिजे असे नाही. मृत्युपत्र करताना व्यक्ती किंवा संपत्तीच्या विवरणात अथवा वाटपात कोणतीही संदिग्धता असता कामा नये. मृत्युपत्राद्वारे संपत्तीचा स्वंतत्र व्यवस्थापकही नेमता येतो आणि तो मृत्युपत्रातील संपत्तीच्या वाटपासाठीचा वैध प्रतिनिधी ठरतो.

मृत्युपत्र या संकल्पनेत इच्छेनुरूप वितरण हा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. त्यासाठी विशिष्ट असा कोणताही आराखडा नाही. साध्या कागदावरही ते करता येते. त्यासाठी मुद्रांक शुल्क (stamp duty) भरावे लागत नाही. फक्त मृत्युपत्र करणारा / करणारी यांचा हेतू संपूर्ण मृत्युपत्र वाचल्यानंतर एकत्रित झाला पाहिजे. सर्वसाधारण मृत्युपत्रानुसार मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीची सही अथवा निशाणी व दोन साक्षीदारांची सही अथवा निशाणी असलेले लेखी मृत्युपत्रच ग्राह्य धरले जाते; पण ते साक्षीदार त्या मृत्युपत्रान्वये मिळकत मिळणारे नाहीत ना, याची खात्री करणे आवश्यक आहे. कारण अशा मृत्युपत्रांच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उभे राहू शकते. तसेच, साक्षीदारांनी मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीसमोर स्वाक्षऱ्या कराव्यात असे अपेक्षित आहे. मृत्युपत्र करणारी व्यक्ती

त्यावेळी स्थिरचित्त व कोणत्याही अनुचित प्रभावाखाली नव्हती, अशा आशयाचे वैद्यकीय प्रमाणपत्रही असणे आवश्यक आहे.

विशेष हक्क मृत्युपत्राद्वारे लष्करी मोहिमेवर गेलेल्या किंवा प्रत्यक्ष युद्धात गुंतलेल्या कोणत्याही भूसैनिक अथवा वायुसैनिक अथवा सागरावरील कोणत्याही नाविकाला जर त्याच्या वयाची अठरा वर्ष पूर्ण झाली असतील तर, संबधित कायद्याच्या कलम ६६ नुसार मृत्युपत्राद्वारे आपल्या संपत्तीचे वितरण करता येते. त्यासाठी साक्षीदार, स्वाक्षऱ्या यासारख्या काही अटी शिथिल करण्यात आलेल्या आहेत.

मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीला आपल्या हयातीत ते केव्हाही रद्द करता येते किंवा त्यात बदल करता येतो. जर एखाद्याने एकापेक्षा अधिक मृत्युपत्रे केली असतील तर ती व्यक्ती मृत झाल्यावर जे मृत्युपत्र सर्वांत शेवटी केले असेल, ते त्या व्यक्तीचे अधिकृत मृत्युपत्र समजले जाते. म्हणजेच, मृत्युपत्रावर तारीख असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जर मृत्युपत्र लिहिल्यानंतर त्यात काही सुधारणा दुरुस्त्या अथवा स्पष्टीकरण करावयाचे असल्यास ते पुरवणी मृत्युपत्र (codicil) द्वारे करता येते. हा मृत्युपत्राचाच भाग समजला जातो.

मृत्युपत्र नोंदणी कायद्यान्वये (Registration Act) नोंदविण्याची सक्ती नाही. परंतु जर तशी इच्छा असेल तर मृत्युपत्र करणाऱ्याला आपल्या हयातीत अथवा सदर मृत्युपत्रान्वये होणाऱ्या वारसांना ते नोंदविता येते, तसेच ते नोंदणी अधिकाऱ्याकडे सुरक्षितही ठेवता येते. सदर व्यक्तीच्या मृत्यूनंतर मृत्युपत्र अमलात आणण्यासाठी, म्हणजेच मृत्युपत्रानुसार संपत्तीचे हस्तांतरण करण्यासाठी जिल्हा न्यायालयात आणि मुंबईसाठी उच्च न्यायालयात अर्ज करून (probate) मृत्युपत्र खरे असल्याचा दाखला घ्यावा लागतो. या संदर्भातले सर्व दावे जिल्हा न्यायाधीश व मुंबईसाठी उच्च न्यायलयाच्या मूळ अधिकारक्षेत्रात येतात. तसेच भारतीय दंडसंहिता (IPC) कलम ४६७ व ४७७ नुसार मृत्युपत्रावर खोट्या सह्या करणे व फसवणुकीने मृत्युपत्र रद्द अथवा त्याचा नाश, विध्वंस करणे हा गुन्हा समजला जातो.

मृत्युपत्र केलेल्या व्यक्तीने जर मृत्युपत्रात त्याविषयीचे विवाद लवादाद्वारे (Arbitration) सोडवावेत असे नमूद केले असेल तर ते वारसांवर बंधनकारक असेल का? याविषयी सर्वोच्च न्यायालयाने नुकताच एक निकाल दिला त्याचा सारांश -

विजयकुमार शर्मा @ मंजू

वि.

रघुनंदन शर्मा @ बाबुराम आणि इतर

MANU/SC/0072/2010

2010 (1) SCALE 688

या सर्वोच्च न्यायालयाने दि. ५ जाने. २०१० रोजी निकाल दिलेल्या खटल्यात मृत्युपत्रात व्यक्त केलेल्या एका इच्छेविषयी विशेष याचिकेद्वारे सर्वोच्च न्यायालयापुढे दाद मागण्यात आली होती.

खटल्याचे थोडक्यात वर्णन असे, हा दावा मुख्यत्वेकरून दोन भावांमधील असून वडिलांनी केलेल्या मृत्युपत्रातील संपत्तीची वाटणी, तसेच मृत्युपत्रासंदर्भात काही मतभेद निर्माण झाले तर ते ॲड. विजय भंडारी यांच्याकडून सोडविण्यात यावेत. या मृत्युपत्रातील अटींसाठी आहे, तसेच मृत्युपत्राच्या वैधतेबद्दलचा खटलाही दुसऱ्या न्यायालयात प्रलंबित आहे. याचिकाकर्त्याचे म्हणणे असे की, मृत्युपत्रात वडिलांनी व्यक्त केलेली ही इच्छा लवाद आणि सलोखा कायदा १९९६ (Arbitration and Conciliation Act,

1996) नुसार लवादासाठीचा करार (Arbitration Aggreement) होऊ शकत नाही. त्यामुळे मृत्युपत्रासंदर्भातील कोणताही तंटा हा फक्त नेमून दिलेल्या लवादनिर्णयानेच सोडवावा हे आमच्यावर बंधनकारक नाही.

सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्याचे म्हणणे मान्य करताना वर उल्लेखिलेल्या कायद्याच्या कलम सात वर भर देऊन म्हटले आहे की, या कलमानुसार कोणताही करार लवाद करार होण्यासाठी तो एका विशिष्ट संबंधासाठी असला पाहिजे. मग तो करारासाठीच्या वा इतर कोणत्याही बाबतीत असो; तसेच तो लिखित असावा; त्यावर पक्षकर्त्यांची सही असावी. त्यासंदर्भात काही पत्रे टेलिग्राम किंवा संवादाची इतर माध्यमे यांद्वारे केलेला व्यवहार त्याचा दस्तऐवज म्हणून समजले जातील, तसेच या संदर्भातील मागणी व त्यावरचे समर्थन ही लवाद कराराची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. न्यायालयाने पुढे म्हटले आहे की, या खटल्यात दोन्ही पक्षकारांकडून असे कोणतेही वर्तन घडलेले नाही. त्यामुळे वडिलांनी व्यक्त केलेली भविष्यात मृत्युपत्रासंदर्भात होणारी भांडणे ही त्यांनी नेमून दिलेल्या लवादाकडूनच सोडवून घ्यावीत ही इच्छा कितीही कल्पनाविलास केला तरी लवादासाठीचा करार होऊ शकत नाही. ती केवळ वडिलांनी व्यक्त केलेली प्रेमळ इच्छा होऊ शकते. मृत्युपत्राविषयीची भांडणे सोडविण्यासाठी मृत्युपत्रात व्यक्त केलेली ही इच्छा/सल्ला मानायचा का नाही हे सर्वस्वी मुलांवर अवलंबून आहे.

सदरचे मृत्युपत्र आणि त्यानंतर त्याला जोडून व्यक्त केलेली ही इच्छा खरी आहे, असे जरी सिद्ध झाले तरी हे विधान पक्षकर्त्यांमधील भांडणे लवादाने मिटविण्यासंबधीचा लिखित करार होऊ शकत नाही. त्यामुळे मृत्युपत्रविषयक भांडणे लवादानेच सोडवावी अशी मृत्युपत्रात व्यक्त केलेली इच्छा अमलात आणणे मुलांवर बंधनकारक नाही.

**संदर्भ :**


- भारतीय वारसा कायदा १९२५
- मृत्युपत्रांचा कायदा ॲड. अभया शेलकर, नाशिक. लॉ हाऊस, औरंगाबाद
- भारतीय दंड संहिता, १८६०
- भारतीय नोंदणी कायदा, १९०८



**सौ. जान्हवी नवरे,**

**सौ. प्रज्ञा राजेबहादूर**

अधिवाख्याता, ठाणे विधी महाविद्यालय

(ठाणे विधी महाविद्यालय वाङ्मय मंडळ)


●●●

### वैज्ञानिक दृष्टिकोन

शालेय शिक्षणात आपल्याला अनेक महत्त्वाच्या गोष्टी शिकविल्या जातात. पण त्यांचे व्यवहारात किती महत्त्व आहे, याची जाणीव निर्माण करण्यात बऱ्याच अंशी आपले शिक्षण कमी पडते. त्यामुळे दैनंदिन जीवनात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव जाणवतो. केवळ अंधश्रद्धाच आपल्या समाजाचे नुकसान करीत आहेत असे नाही, तर वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव हेही तेवढेच किंवा त्यापेक्षाही अधिक नुकसानकारक आहे. विज्ञानाला पुस्तकांमध्ये बंदिस्त करून ठेवल्यामुळे अनेक घोळ होतात.

\- संग्रहातून

# उत्तररामचरित्‌कर्ता भवभूति

*संस्कृत साहित्याचा व्यासंग असणाऱ्या सौ. सुनिता खरे यांचा 'भवभूति' वरील लेख येथे देत आहोत. 'भारतातील शेक्सपिअर' अशा शब्दांत गौरवण्यात आलेल्या या महाकवीच्या साहित्याचा परिचय या लेखात करून देण्यात आला आहे - संपादक*

संस्कृतचा अभ्यास करीत असताना 'अविदितगतयामा रात्रिदेवं व्यरंसीत्' म्हणजे रात्रच संपली, पण गुजगोष्टी काही संपल्या नाहीत ही ओळ कालिदासाची रसिकता आपण गुणग्राहकता सांगताना अनेकांनी अनेक वेळा सांगितलेली मी ऐकली आहे. एम्.ए. ला भवभूति हा अभ्यास विषय होता, तेव्हा ह्या गोष्टीची पूर्वपीठिका व संपूर्ण श्लोक वाचनात आला.

कालिदास हा ज्येष्ठ, राजमान्य आणि लोकमान्य कवी. म्हणून भवभूतीने जेव्हा उत्तररामचरित हे नाटक लिहिले तेव्हा ते त्याने अभिप्रायाच्या अपेक्षेने कालिदासाकडे नेले. गोष्ट असे सांगते की त्या वेळी कालिदास सारीपाट खेळण्यात दंगला होता म्हणून त्याने भवभूतीला नाटक वाचून दाखविण्यास सांगितले. नाटक ऐकून त्याने नाटकाची प्रशंसा केली आणि एक दुरुस्ती सुचविली. नाटकाच्या पहिल्या अंकात दंडकारण्यात आपण रहात असताना सीतेबरोबर वार्तालाप करीत रात्री कशा व्यतीत केल्या हे राम सांगत आहे. तो म्हणतो -

किमपि किमपि मन्दं मन्दमासत्तियोगा

दविरलितकपोलं जल्पतोरक्रमणे।

अशिथिलपरि रम्भव्या पृते कैकदोष्णो

रविदित गतयामा रात्रिदेवं व्यरंसीत्॥

म्हणजे, गाढ आलिंगनात उभयतांचा एकेक हात गुंतून गेला असता एकमेकांच्या गालाला गाल लावून अत्यंत सान्निध्यामुळे अगदी हळू स्वरात आपण गुजगोष्टी करीत असतो, रात्र अशा रीतीनं संपली. कालिदासाने या श्लोकाच्या चतुर्थ चरणांतील एवं या शब्दांतील अनुस्वार गाळावा अशी सूचना केली आणि भवभूतीने ह्या बदलामागील रसिकतेला दाद देऊन ती सूचना मान्य केली व तो चरण 'अविदितगतयामा रात्रिदेव व्यरंसीत्' असा केला. म्हणजे आता त्याचा अर्थ असा झाला की 'आमच्या गुजगोष्टी संपल्या नाहीत पण रात्रच संपून गेली.' एकमेकांची रसिकता आणि मोठेपणा मान्य करणारी अशी ही कवींची जोडी.

**भवभूतीचे नाव :**

भवभूती हा इसवी सनाच्या आठव्या शतकात होऊन गेलेला प्रसिद्ध संस्कृत नाटककार. त्याने महावीर चरित, मालतीमाधव आणि उत्तररामचरित अशी तीन नाटके लिहिली. यांपैकी महावीरचरित व उत्तररामचरित् ही नाटके, तर मालती माधव हे प्रकरण आहे. डॉ. मिराशींच्या मते इ.स. ७०० ते ७३० हा त्याच्या ग्रंथरचनेचा काल होय. महावीरचरित हे त्याने लिहिलेले पहिले नाटक. त्याच्या प्रस्तावतेन त्याने स्वत: विषयी थोडी माहिती दिली आहे. उदुंबर हे त्याचे कुलनाम. हे कुल तैत्तिरीय शाखेचे, काश्यप गोत्री, पंचाग्नी ठेवणारे, सोमयाग करणारे आणि ब्रह्मवेत्ते अशा विद्वान व सत्त्वशील ब्राह्मणांचे. भवभूतीच्या महाकवी नावाच्या पाचव्या पूर्वजाने वाजपेय यज्ञ केला होता. भट्टगगोपाल हे भवभूतीच्या पितामहाचे तर नीलकंठ हे त्याच्या पित्याचे नाव. मातेचे नाव जातूकर्णी.

आरश्यात स्वत:चे प्रतिबिंब दिसते; तर हृदयात स्वत:च्या आत्म्याचे प्रतिबिंब दिसते.

भवभूतीचे पूर्वज दक्षिणापथातील पद्मपूर नावाच्या नगरात रहात. आजच्या विदर्भाच्या भंडारा जिल्ह्यातील आमगावानजिकचे पदमपूर हेच प्राचीन पद्मपूर. ह्या पद्मपुरात भवभूतीचा जन्म झाला.

महावीरचरित नाटकातच कवीचे नाव देताना 'श्रीकण्ठपदलाञ्छन: भवभूर्तिनाम' असा शब्द प्रयोग केलेला आहे. भवभूतीचा पिता नीलकण्ठ. तेव्हा त्याने आपल्या मुलाचे नाव श्रीकण्ठ ठेवले असावे असे अनेक टीकाकार म्हणतात. नंतर त्याने एक सुंदर श्लोक रचला व त्यावरून त्याला भवभूति असे नाव पडले असे एक आख्यायिका सांगते. तो श्लोक असा आहे.

''कां तपस्वी गतोऽवस्थामिति स्मेराविव स्तनौ।

वन्दे गौरीघना शेषभवभूतिसिता न नौ॥

भगवान शंकराने पार्वतीला गाढ आलिंगन दिले तेव्हा त्याच्या अंगावरच्या भस्माने पार्वतीचे स्तन शुभ्र झाले. 'प्रेम प्रभावामुळे या तपस्व्याची काय अवस्था झाली आहे पहा' असेच जणू ते हसून सांगत होते. त्या स्तनांना माझा नमस्कार असो.'

काही विद्वानांच्या मते (यात डॉ. मिराशी येतात) भवभूती हेच त्याचे मूळचे नाव आणि श्री म्हणजे वाग्देवी त्याच्या कंठात असल्याने त्याला श्रीकण्ठ ही पदवी मिळाली. राजशेखर कुंतक, विद्याकर इ. कवींनी त्याचा उल्लेख भवभूती याच नावाने केला आहे. भवभूतीचे उंबेक असे आणखी एक नाव होते असे काही जण म्हणतात पण डॉ. मिराशी म्हणतात. भवभूती व उंबेक ह्या दोन भिन्न व्यक्ती आहेत.

**साहित्य :**

वेद, उपनिषदे, सांख्य, योग, पूर्वमीमांसा, न्याय वेदान्त तसेच अर्थशास्त्र व कामशास्त्र यांचा भवभूतीने अभ्यास केला होता. संस्कृत भाषेवर त्याचे प्रभुत्व होते. देवी सरस्वती त्याला सर्वस्वी वश होती असे उत्तमरामचरितात म्हटले आहे. वीर, शृंगार, करुण इ. रसांचा परिपोष त्याने आपल्या नाटकांत केला आहे व तो रसिकमान्यही झाला आहे.

प्राचीन काळी जेव्हा व्यापारासाठी जाणाऱ्यांना रस्ते सुरक्षित वाटत नव्हते तेव्हा अनेक व्यापारी एकत्र येऊन एका व्यापारी केन्द्राकडे असा एकत्र प्रवास करीत. व्यापारांच्या ह्या तांड्याला 'सार्थ' ही संज्ञा असे आणि त्यांच्या पुढाऱ्याला सार्थवाह असे म्हटले जाई. ह्या सार्थवाहाच्या मालाने भरलेल्या गाडीवर त्याचे निशाण असे. त्या निशाणामागून इतर व्यापाऱ्यांच्या गाड्या जात. 'उदयसुन्दरी कथा' चा लेखक सोड्ढल याच्या मते भवभूतीचे ग्रंथ पाहून तदनुसार त्यांच्या नंतरच्या कवींनी आपले ग्रंथ रचले आणि त्याचे ग्रंथ लोकमान्यता पावले. तो त्याच्या उदयसुन्दरीच्या कथेत लिहितो,

''मान्यो जगत्यां भवभूतिरार्य: सारस्वते वत्मनि सार्थवाह:।

वाचं पताकामिव यस्य दृष्ट्वा जन: कवीनामनुपृष्टमेति ॥''

संस्कृत नाट्यशास्त्रानुसार नाटकांचे प्रकार दहा. पैकी दोन मुख्य प्रकार म्हणजे नाटक आणि प्रकरण. नाटकाचा विषय सर्व लोकांमध्ये प्रसिद्ध असलेले देवचरित किंवा राजचरित असा असतो; तर प्रकरणाची कथा काल्पनिक असते. तदनुसार पहाता भवभूतीची 'महावीरचरित' आणि 'उत्तररामचरित' ही नाटके आहेत, तर मालतीमाधव हे प्रकरण आहे.

भवभूतीने 'संपूर्ण रामचरित्र' हा विषय घेऊन त्यावर दोन नाटकांची कथा रचली. विश्वमित्र ऋषी आपल्या यज्ञाच्या रक्षणार्थ राम व लक्ष्मण यांना घेऊन आपल्या सिध्दाश्रमात जातात तेथपासून ते रावणवधानंतर राम लक्ष्मण व सीता यांसह अयोध्येस परत येतात.

येथपर्यंतचा भाग महावीरचरित या नाटकात येणार होता; परंतु पाच अंक लिहून झाल्यावर भवभूतीने ते तत्कालीन विद्वानांना व रसिकांना परीक्षणासाठी दाखविले. स्वत:च्या विद्वत्व, कवित्व, रसिकत्व इ. गुणाची त्याला जाणीव होती आणि विद्वत्तेप्रमाणे साहित्यनिर्मितीत ही आपण सर्वश्रेष्ठ गणले जावे अशी महत्त्वाकांक्षा मनी होती. पण रसिकांनी त्याचे नाटक कमी प्रतीचे लेखले आणि त्यातील दोष दाखविले. ते दोषदिग्दर्शन ऐकून तापट भवभूतीला राग आला. तो म्हणाला '' जे अहंमन्य लोक आमची अवज्ञा करीत आहेत, त्यांच्यासाठी मी हे नाटक लिहिलेले नाही. मला असा विश्वास आहे की माझ्याशी समान धर्म असा कोणी रसिक पुढे मागे निर्माण होईल. कारण काल अनंत आहे आणि ही पृथ्वी विशाल आहे.''

ये नाम केचि दिहन: प्रथयन्त्यवज्ञां जानन्ति ते किमपितान् प्रतिनैष यत्न :।

उत्पत्स्यतेडस्ति मन कोडपि समानधर्मा कालो हययं निरवधिविपुलाच पृथ्वी ॥

रागाच्या भरात भवभूतीने महावीरचरित अपूर्णच सोडले आणि तो घर सोडून उत्तरेत निघून गेला. महावीरचरिताच्या पाचव्या अंकांतील ४६ व्या श्लोकानंतरचा भाग आणि ६ व ७ हे दोन अंक नंतर सुब्रह्मण्य नावाच्या दुसऱ्या कवीने लिहिले आहेत, असे महावीरचरिताचा टीकाकार वीरराघव म्हणतो.

**उत्तररामचरित :**

रामचरिताच्या पुढील भाग म्हणजे अभिषेकानंतर त्याने केलेल्या सीतात्यागापासून बारा वर्षांनतर झालेल्या दुसऱ्या सीताशुद्धीपर्यंतचा भाग हा उत्तररामचरिताचा कथाभाग आहे. संपूर्ण रामचरितावर नाटके लिहणारा असा भवभूती हा एकटाच संस्कृत कवी आहे. रामाच्या चरित्रावर घेतल्या जाणाऱ्या आक्षेपांचे निराकरण भवभूतीने महावीरचरितामध्ये केले आहे. उदा. वाली हा रावणाचा सहाय्यक बनून रामाशी लढण्यास आला म्हणून रामाने त्याचा वध केला असे त्याने सांगितले आहे. हे नाटक वीररसप्रधान आहे भवभूतीचे मालती-माधव हे एक दहा अंकाचे प्रकरण आहे. ही मालती व माधव यांची प्रेमकथा आहे. यौवनातील प्रेमाचे चित्रण करताना भवभूतीने उच्च व उदात्त प्रेमाची कल्पना रसिकांसमोर मांडली असून धर्माच्या विरोधात असणारे प्रेम समाजाला हानि पोचवते; म्हणून ते त्याज्य होय अशी त्याची भूमिका आहे, असे वाटते.

उत्तररामचरित हे सात अंकी नाटक रामायणाच्या उत्तरार्धावर आधारित असून रामाच्या राज्यभिषेकापासून सीतात्यागानंतरच्या पुनर्मीलनापर्यतचा भाग यात आला आहे. मात्र रामायण हे काव्य असून त्याचे दृश्यकाव्यात रूपांतर करावयाचे असल्याने लेखकाला मूळ कथेतील काही भागात बदल करणे आवश्यक वाटले आहे. मूळ रामकथेत शेवटी सीतेला धरती आपल्या पोटात घेत असे दाखविले आहे. भवभूतीने मात्र नाट्यपरंपरेला अनुसरून उत्तररामचरित नाटक सुखान्त बनवून सीतामीलनाचा प्रसंग काल्पिला आहे. तसेच नाटकातील चित्रदर्शनाचा प्रसंग, रामाचे दंडकारण्यात पुनरागमन, वनदेवता बासंतीशी भेट, तेथे छायारूपाने सीतेचे अस्तित्व ह्या सर्व काल्पित घटना आहेत. भवभूतीची नाटके वाचताना ह्रदयाला अवर्णनीय आनंद होतो असे एक सुभाषित आहे (अन्तर्मोदं कमपि भवभूतिवितनु) ही नाटके श्रेष्ठ काव्यगुणांनी नटलेली आहेत हे याचे कारण होय. भवभूति हा रससिध्द कवी आहे. त्याने नाटकात वीर आणि करुण रस प्रामुख्याने साधले आहेत. त्याच्या मते

'' एको रस: करुण एव निमित्तभेदाद्

आवर्तबुद्बुदतरड;मयान विकारान

अम्भो यथा सालिलमेव तु तत्समग्रम् ॥ उत्तर॥

त्याग म्हणजे समोरच्या व्यक्तीचा फायदा होण्यासाठी स्वत:चे नुकसान स्वीकारणे.

म्हणजे एकच करुण रस भिन्न भिन्न निमित्तांमुळे निरनिराळी रूपे धारण करतो. भोवरे, बुडबुडे, लाटा अशी निरनिराळी रूपे दिसली, तरी त्यांच्या मुळाशी जसे पाणी हेच एक द्रव्य असते तसेच हे आहे.

**नाटकाबद्दल :**

भवभूति आणि कालिदास समकालीन असून त्यांच्यात श्रेष्ठत्वाबद्दल वाद चाले अशा आख्यायिका प्राचीन परंपरेच्या पंडितवर्गात प्रचलित होत्या आधुनिक विद्वानांतही अशी चर्चा दिसते. पण या दोघांच्या ग्रंथाची चिकित्सकपणे तुलना केल्यास कालिदासाची श्रेष्ठता मान्य करावी लागते. तो आधिक कुशल कलाकार आहे. संयम आणि औचित्याची जाणीव त्याच्या ठायी आधिक आहे. संविधानकाची रचना, रसपरिपोष , स्वभावरेखन या बाबतीत ही तो उजवा आहे. भवभूतीच्या भाषेत कृत्रिमता, पाल्हाळिकता हा दोष आधिक आहेत असे अभ्यासकांचे मत आहे. विविध रसांच्या वर्णनांत तो कुशल असला तरी 'कारुण्यं भवभूतिरेव तनुते' ही त्याच्या करुणरसवर्णनांतील त्यांच्या श्रेष्ठत्वाबद्दलची उक्तीमात्र अतिशयोक्तिची वाटते.

एतत्कृतेकारुण्ये किमन्यथा अपिरोदिति ग्रावा (दगडालाही त्याच्या कारुण्य परिपोषाने पाझर फुटतो) हे ही असेच अतिशयोक्त विधान उत्तररामातील रामाचा विलाप, त्याचे दु:ख वाचताना असे जाणवते की हे चित्रण करुणरसाचा पुरेसा अविष्कार करू शकत नाही रघुवंशामध्ये इंदुमतीच्या मृत्यूनंतर येणारा अजविलाप वाचताना वाचक अजाच्या दु:खाशी एकरूप होतो. ''विललापस बाष्पागद्‌गदं सहजामप्यपहाय धीमतामत्'' येथून अजाचे दु:ख वर्णन करण्यास कालिदास सुरुवात करतो. अर्धकळत्या शालेय वयात वाचलेल्या ह्या विलापाने काळजांत असे घर केले आहे की इतक्या वर्षांनंतर ही त्यातले श्लोक आजही मुखोद्‌गत राहिले आहेत. वाचक अजाच्या दु:खात सामील होतो. त्याच्या डोळ्यात पाणी येते अशा श्रेष्ठतेचा हा विलाप भवभूतीला रामासारख्या धीरोदात्त नायकाला वरचेवर बेशुद्ध करावे लागते. म्हणजेच नाटक बघून जर प्रेक्षकाच्या डोळ्यांत पाणी येत असेल तर ते भवभूतीमुळे नव्हे तर नटाच्या कुशलतेचा वाटा त्यात असतो. शिवाय अशा बेशुद्ध पडण्यामुळे रामासारख्या धीरोदत्त नायकाच्या व्यक्तिरेखेला बाधा पोहोचते. कोणी असे म्हणेल की अजविलाप काव्य म्हणजे श्राव्यमाध्यम आहे आणि म्हणून या दोन्हीची तुलना करणे अयोग्य आहे. पण भवभूतीसारखा लेखक जो स्वत:ला वश्यवाक् म्हणवितो त्याची शब्दशक्ती येथे कमी पडते आणि म्हणून तो नटाच्या अभिनयकुशलतेला आधिक वाव देऊन कारुण्याची अभिव्यक्ती करीत आहे. असे वाटते. डॉ. एस. ए. डांगे यांनी ह्यासंबंधांत त्याच्या 'Critiques on Sanskrit Drama' मध्ये असे निदर्शनास आणले आहे की उत्तररामाच्या ७ पैकी ३ अंकामध्ये सीता रंगमंचावर दिसते. प्रेक्षकांना रामसीतेचा वियोग तात्पुरता आहे हे माहीत असते. त्यामुळे विप्रलंभशृंगार हा ह्या नाटकाचा मुख्य रस असून कारुण्य हा व्यभिचारीभाव आहे. त्यामुळे त्याच्या हृदयात शोकाला पुरेशी खोली लाभत नाही.

भवभूती जेव्हा रौद्र आणि बीभत्स रसांचा परिपोष करतो तेव्हा मात्र तो रसिकांना भुलवल्याशिवाय रहात नाही. डॉ. गो. के. भट यांनी निसर्गाला दोन आपत्य होती - 'कालिदास आणि भवभूती' असे म्हटले आहे. ह्या उक्तीच्या खरेपणाचा प्रत्यय भवभूतीच्या निसर्गवर्णनांमध्ये पदोपदी येत राहतो. निसर्गाच्या कोवळिकीची, वर्णने कालिदासाने बहारदार केली आहेत. पण निसर्गाची भीषणता, उदात्तता यांचे वर्णन भवभूतीने फार सुरेख चित्रित केले आहे. उदाहरणादाखल

''दधति कुहरभाजामत्र भल्लकयूनां '' (उत्तरराम २-२१)

किंवा

''निष्कूजस्तिमिता: क्वचित्कचिदपि प्रोच्चण्डसत्त्वस्वना:
(उत्तरराम २-१७)

असे श्लोक सांगता येतील. अस्वलांची गुरगुर, हत्तींनी चिरडलेल्या सल्लकी वृक्षाच्या गाठींचा उग्र वास जंगली जनावरांच्या भयानक गर्जना, घुबडांचे घूत्कार इत्यादी वर्णने वाचतांना आपण खरोखरीच जंगलात वाट चुकलो आहोत असे वाटून, भीती आपला कबजा घेते. कधी कधी त्याच्या श्लोकांमधील शब्दांचा नाद त्याच्या अर्थाला पोषक आहे असे वाटते.

समाजप्रबोधन हे प्रसारमाध्यमांचे उद्दिष्ट आहे हे भवभूतीने एवढ्या पुरातन काळी जाणले होते. स्त्रीच्या शारीरीक सौंदर्यापलिकडे जाऊन प्रियेच्या स्पर्शाचे औषधीमूल्य नजरेस आणून देणारा असा हा अद्वितीय द्रष्टा कवी. जेव्हा रौद्र किंवा बीभत्स रसाचा परिपोष करायचा असेल तेव्हा त्याचे शब्द कठोर होतात पण मानवी हृदयातील भाव वर्णन करायचे असतील तेव्हा त्याची भाषा सहज सोपी होऊन जाते. म्हणूनच, आजही तो रसिकप्रिय आहे. क्लीन नावांच्या टीकाकाराने तर त्याला 'भारतातील शेक्सपिअर' असे संबोधले आहे.

**सौ. सुनीता जयंत खरे**
५४, मेघदूत 'बी' सोसायटी
शहाजी राजे रोड, कोलडोंगरी
अंधेरी(पूर्व) मुंबई - ४०००६९
दूरध्वनी - २६८२६६९४
भ्रमणध्वनी ९९२०७१०५९०

●●●

## पैशाने मिळणाऱ्या वस्तू

१) पैशाने मनोरंजन मिळेल पण - सुख मिळणार नाही.

२) पैशाने गाद्यागिरद्या मिळतील - पण झोप मिळणार नाही.

३) पैशाने पुस्तके मिळतील - पण बुद्धी मिळणार नाही.

४) पैशाने शिक्षण मिळेल - पण सज्जनता मिळणार नाही.

५) पैशाने अन्न मिळेल - पण भूक मिळणार नाही.

६) पैशाने घरे मिळतील - पण परिवार मिळणार नाही.

७) पैशाने ऐषाराम मिळेल - पण संस्कृती मिळणार नाही.

८) पैशाने औषधे घेता येतील - पण स्वास्थ मिळणार नाही.

९) पैशाने सुंदर देऊळ बांधाल - पण ईश्वर मिळणार नाही.

१०) पैशाने शस्त्र विकत घ्याल - पण त्यासाठी शौर्य मिळणार नाही.

आपण खूप वाचतो, लिहितो व इतर अनेक गोष्टी करतो. त्याला पैसा उपयोगी पडेल पण त्या पैशाने मन:शांती, आत्मिक ज्ञान, परमेश्वर प्राप्ती मिळणार नाही किंवा यासाठी पैशाचा यत्किंचितही उपयोग होणार नाही.

संकलन - माननीय श्री. श्री. वि. करंदीकर

# 'झुंड' : दोन संस्कृतीतील सनातन झगडा

*मराठी साहित्यातील प्रख्यात कादंबरीकार, समीक्षक, आत्मचरित्रकार, दलित साहित्य व चळवळीचे जाणते अभ्यासक डॉ. शरणकुमार लिंबाळे यांच्या साहित्यावर समीक्षात्मक ग्रंथ पुण्याच्या दिलीपराज प्रकाशन संस्थेतर्फे प्रकाशित होतो आहे. सुप्रसिद्ध समीक्षक, अभ्यासक आणि प्रख्यात भाषाशास्त्रज्ञ डॉ. रमेश धोंगडे या ग्रंथाचे संपादन करीत आहेत. अनेक नामवंत समीक्षक अभ्यासकांनी या ग्रंथात डॉ. लिंबाळे यांच्या साहित्याचा खोलात शिरून आढावा घेतला आहे. त्यापैकी डॉ. लिंबाळे यांच्या 'झुंड' या कादंबरीवर लिहिला गेलेला डॉ. प्रदीप कर्णिक यांचा लेख छापत आहोत - संपादक*

**प्रास्तविक :**

शरणकुमार लिंबाळे हे मराठी वाङ्मयातील एका संपन्न प्रवाहातील, दलित साहित्यातील, एक महत्त्वाचे लेखक आहेत. साधारण ८० च्या दशकात त्यांच्या वाङ्मयीन जीवनाची वाटचाल सुरू झाली. कविता, कथा याबरोबरच १९८४ साली त्यांच्या 'अक्करमाशी' या आत्मचरित्राने मराठी वाङ्मयात खळबळ माजवली. आपल्या प्रांजळ लेखनाने, आपले 'अक्करमाशीपण' कुठेही न लपवता, त्यांनी निवेदन केले व त्याची दखल सर्वच स्तरावर घेतली गेली. यश व कीर्तीही त्यास प्राप्त झाली.

तीन कविता संग्रह, चार कथासंग्रह, पाच कादंबऱ्या तीन आत्मचरित्रे (जी एकाच पुस्तकाची विस्तारित रूप आहेत.), चार समीक्षा ग्रंथ आणि अकरा संकलनात्मक संपादने इतकी विपुल ग्रंथसंपदा डॉ. लिंबाळे यांच्या नावावर आहे.

देश आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांचे विविध ग्रंथ भाषांतराच्या माध्यमांतून पोहोचले आहेत. पैकी तीन इंग्रजीत, सात हिंदीत आणि कन्नड, पंजाबी, मल्याळम व तामिळ भाषेत प्रत्येकी एक ग्रंथ, भाषांतरित झाला आहे. या भाषांतरित ग्रंथांत प्रामुख्याने 'अक्करमाशी' चा जास्त समावेश असणं, हे रास्तच म्हणायला हवे.

दलित साहित्याचा प्रवाह तपासला तर, असे लक्षात येते की, आत्मचरित्रावर अडकून पडलेले लेखक जसे त्यात दिसतात, तसेच आत्मचरित्रापेक्षा त्यांच्या इतर लेखनाचा प्रभाव विशेष जाणवत नसलेलेही अनेक लेखक त्यात आहेत. लिंबाळे मात्र याला अपवाद म्हणावे लागतील. बहुप्रसवा असूनही, त्यांनी त्यांच्या साहित्याचा दर्जा राखला आहे, किंबहुना तो कलौघात विस्तार पावला आहे. मात्र त्यांच्या साहित्याची दखल जेवढी घ्यायला हवी होती तशी घेतली गेली नाही, हे खेदाने नमूद करायला हवे. ते स्वत: उत्तम समीक्षक असूनही त्यांची सर्जनशील कलाकृती त्यामुळे बाधित झाली नाही हे त्यांचे लेखक म्हणून मोठे वैशिष्ट्य मानावे लागेल.

प्रत्येक लेखकाला खुणावत असणारी ट्रायोलॉजी, शृंखलात्मक कादंबरीही, त्यांनी 'उपल्या', 'हिंदू' व 'बहुजन' याद्वारे सादर केली, आणि मगच स्वतंत्र कादंबऱ्यांकडे ते वळले. २००९ या सालात 'झुंड' आणि 'दंगल' नावाच्या, काहीशा विषयाचे साधर्म्य असेल असे वाटायला लावणाऱ्या, कादंबऱ्या त्यांनी प्रकाशित केल्या; परंतु त्यात फारसे साधर्म्य नाही. झुंडीचे मानसशास्त्र ज्याच्या मागे लपलेले असते असे हे दोनही विषय असल्याने, थोडासा गोंधळ होण्याची दाट शक्यता आहे, पण 'झुंड' ही शिक्षण व्यवस्थेवरील, एका दलित

शिक्षकावरची कादंबरी आहे. शिक्षण व्यवस्थेत ते स्वत: अनेक वर्षे आहेतच. चळवळीतील अनेक अनुभव गाठीशी असल्याने, दलित विद्यार्थ्यांची होणारी घुसमट व त्यांचं उद्‌ध्वस्त होणं त्यांनी पाहिलं आहे. काही ताण तर स्वत:ही अनुभवले आहेत. त्यामुळे या सर्वांचे 'ऑडिट' करावे ही भूमिका स्वीकारून त्यांनी शिक्षण व्यवस्थेवर कादंबरी लिहिली आहे.

**'झुंड' चे कथानक :**

सुदाम आणि सावित्रीचा मुलगा, आनंद काशीकर, जो ग्रामीण भागात शिक्षकाची नोकरी मिळाली आहे म्हणून चालला आहे. त्याला सोडायला आलेले त्याचे आई-वडील बस डेपोवर येतात आणि उत्तर भारतीयांवरचे हल्ले सुरू होतात. याच सुदामाच्या आई वडिलांना अनेक वर्षांमागे झुंडीने जाळून मारून टाकलेलं असतं. त्या प्रसंगातली आईची किंकाळी आणि तो प्रसंग आजही सुदामा विसरू शकत नाही. अशा कायमच्या भीतिग्रस्त अवस्थेत वावरणारा एक बाप, असल्या दंगलसदृश वातावरणात, पोटाच्या आशेने मुलाची पाठवणी करतोय, पण तो स्वत:च साशंक आहे. धास्तावला आहे.

आनंद काशीकर हा असा तरुण आहे की, त्याच्या दाखल्यावर 'जात' या रकान्यात 'माणूस' हीच जात नोंदवलेली आहे. काशीकर या आडनावामुळे, देखण्या रूपामुळे, इंग्रजीसारख्या विषयामुळे, आनंद ब्राह्मणच गणला जातोय. ज्या आमदार पिसाळांच्या वडिलांच्या नावाने निघालेल्या शाळेत तो नोकरीस येतो, तिथे त्याला सर्वच जण ब्राह्मण समजतात व आनंदही तो समज तसाच ठेवतो.

शाळेचे मुख्याध्यापक जोशी त्याला प्रथम आपल्या घरी नेतात, 'आपल्यातीलच' असल्याने जेवायला घालतात. नारायण पडवळसारख्या क्लासवाल्याच्या घरी त्याची राहायची, खाण्याची सोय करतात. पडवळ पक्के ९६ कुळी मराठा आणि सवयीचे गुलाम म्हणून ॲट्रॉसिटीच्या खाली तुरुंगात जाऊन आलेले पक्के जातीयवादी व्यापारी वृत्तीचे 'क्लासवाले' असतात, पण त्याहीपेक्षा जास्त संतापी, रागीटही असतात.

आमदाराचे मेव्हणे, त्यांचे पिट्टे, गावातला सारा कारभार सांभाळतात. तिथले राजकारण, संस्था, माणसं, समारंभ, रीतभात सारं काही त्यांच्याच हातात, मात्र शाळेतले दलित शिक्षक कांबळे सर मात्र धारदार नजरेनं सर्वांना अस्वस्थ करीत राहतात. ते कधी कचाट्यात सापडतात, यावर दबा धरून बसलेल्या मंडळींना कांबळे सलतच राहतात. यांच्याचमुळे पडवळ तुरुंगात जाऊन आलेला असतो.

आनंद कांबळे सरांकडे आकर्षित होतो, पण जात चोरून ठेवलेली असल्याने मराठा-ब्राह्मण वर्गातच रमतो. पडवळच्या घरात तो रहात असल्याने त्याला एकदा चोरून ठेवलेली जात उघडही करता येत नाही. प्रयत्न करूनही त्याला कोणी गावात खोली देत नाही. किंवा वसतिगृहात येऊन पडलेले नारायण पडवळला आवडत नाही.

कांबळे गुरुजी, त्यांचे दोन तीन मित्र यांच्या विरोधात परीक्षेच्या दिवशी कॉपी प्रकरणात राजकारण शिजतं आणि पुढे ती परिस्थिती हाताबाहेर जाऊन दलित वस्तीवर हल्ला होतो. याचे पडसाद वृत्तपत्रात उमटतात आणि पडवळ, आमदाराचे पिट्टे तुरुंगात जातात. इथून नारायणच्या जीवनात उलथापालथ होते. त्याची एकाकी बायको, जी पूर्वाश्रमीची ब्राह्मण आहे व या आंतरजातीय विवाहामुळे नारायणचे घर त्या दोघांना पारखे झाले आहे, तिला आधारासाठी आमदार पिसाळच्या मेव्हण्याकडे, मुझुमदारकडेच यावे लागते. अर्थात मुझुमदार जो फायदा घ्यायचा तो घेतोच.

नारायण सुटून येतो. मात्र नव्या नात्याच्या जीवावर मुझुमदारच्या इशाऱ्यावर नारायण पडवळची बायको शाळेत शिक्षिका होते, पुढे मुख्याध्यापक जोशी यांना

सक्तीची निवृत्ती घ्यायला लावून, नारायण पडवळची बायको मुख्याध्यापक होते. संगणकाची कोणतीही पदवी, पदविका नसताना, ती संगणक या विषयाची शिक्षिका होते. आनंद काशीकरच तिला घरी संगणक शिकवतो. कोणतीही पदवी नसताना ती मुख्याध्यापक होते व हळूहळू तिचा विळखा शाळेवर पडतो. ती शाळा, तिचे घर, जणू राजकारणाचे, काटा काढायचे, एक महत्त्वाचे स्थळ होते. यातूनच कांबळेवर चारित्र्यहननाची केस होऊन, कांबळे गुरुजींना काढून टाकण्यात येते. जोशीसर गावी जातात. या मंडळींना रान मोकळंच मिळतं.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो शाळेच्या ग्रंथालयात लावण्यावरून जातीयवादी मग्रूर पडवळ पती-पत्नी विरोध करतात. तो प्रश्न चिघळतो. नारायण पडवळच्या बहिणीमध्ये, सुषमामध्ये आनंद काशीकर गुंतत जातो, पडवळ पती-पत्नींचीही त्यांच्या लग्नाला संमती असल्याने व तारुण्याची सळसळ एकांत घरात शरीरात पसरून जाते व सुषमा गर्भवती बनते.

फोटो प्रकरणात आनंदची साथ पडवळ पती-पत्नी गृहीत धरतात, पण डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेमुळेच आपण शिकू शकलो, मोठे झालो ही भावना प्रबळ ठरल्याने आनंद काशीकर विरोध करतो आणि पडवळच्या 'का' या प्रश्नामुळे तो आपली जात उघड करतो. साराच गदारोळ उठतो. ब्राह्मण, मराठा कुटुंब तो नासवतोच, पण मंदिर, नदी, पाणवठेही तो नासवतो. मुळात झालेली-केलेली फसवणूकच लोकांच्या जिव्हारी लागते. आनंदही सर्वाची माफी मागत दिवसभर हिंडतो, पण फसवणूक झाल्याची भावना झुंड होते आणि हीच झुंड आनंदला फासावर लटकवते. आनंदचे आई-वडील येतात आणि त्यांना धक्काच बसतो. सुषमाला पडवळ पती-पत्नी गर्भ पाडायचा सल्ला देऊनही ती माणसाला न मारता जन्म देण्याचे ठरवते. गावातील 'लेक माणूस' च महाराचा गर्भ वाढवते. गावात जे कधीच घडलेलं नव्हतं, ते घडत होतं.

**शिक्षण व्यवस्थेचं ऑडिट :**

शिक्षण व्यवस्थेचं 'ऑडिट' करण्याच्या निमित्तानं डॉ. लिंबाळ यांनी ही कादंबरी लिहिली आहे. गावातली एक खाजगी शाळा, जिचा सारा कब्जा आमदाराच्या हातात आहे. ही शाळा तशी छोटी नाही. तिला वसतिगृह आहे. मुख्याध्यापकाला राहण्यासाठी क्वार्टर आहे. शाळेला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय असे दोन विभाग आहेत. गोडाऊन मध्ये सुरू केलेल्या 'काशीनाथ प्रशाले' ची अल्पावधीत भव्य इमारत होते. त्यात मोठे ग्रंथालयही आहे. सकाळी सात वाजल्यापासून संध्याकाळी साडे पाचपर्यंत दोन सत्रांत शाळा चालत असल्याने, रातमसल्याच्या आजूबाजूच्या खेड्यातील मुलांची शिक्षणाची सोय झाली आहे. इमारतीच्या उद्घाटनाला आमदारांमुळे मुख्यमंत्री गावात येऊन गेले आहेत. आमदार निधीतून शाळेला संगणक मिळतात. त्याचा प्रशिक्षणाचा स्वतंत्र विभाग सुरू होतो. चकाचक वातानुकुलित विभाग रातोरात उभा राहतो. गावात जिल्हा परिषदेची शाळा आहे, पण ती जणू एका बाजूलाच पडली आहे.

भक्कम इमारत, वसतिगृह, ग्रंथालय, वातानुकुलित संगणक विभाग, क्वार्टर अशी वरून झकपक दिसणारी शिक्षण व्यवस्था, आतून मात्र कीड लागून पोखरून जावी तशी झाली आहे. भ्रष्टाचाराने भरून गेली आहे.

जिल्हा परिषदेच्या शाळेतून काढून टाकलेला नारायण पडवळ आमदाराने आपल्या शाळेत, तो त्याचा वर्गमित्र असल्याने, स्वीकारलेला आहे. एक लाख रुपये घेऊन एका शिपायाला आमदाराने शाळेत चिकटवले आहे. कनिष्ठ महाविद्यालयातील दोघा शिक्षकांकडून नोकरीप्रीत्यर्थ तीन लाख रुपये घेतलेले आहेत. आमदारासाठी राबणारे पिट्टे संस्थेत पगारापुरते नोकरीत असतात. शाळेत इंग्रजी विषयासाठी शिक्षक नसल्याने नाइलाजाने दौलत कांबळे या दलित शिक्षकाला त्या

विषयासाठी अलाऊन्स द्यावा लागत असे. कांबळे गुरुजींचा पत्ता कापण्यासाठी आनंद काशीकरला नोकरी दिली जाते. कांबळेला टेन्शन द्यायला, मेमो द्यायला आमदार सतत बजावत असतात. तो संस्था सोडून गेला पाहिजे अशी वेळ त्याच्यावर आणा, असा इशारा आमदार देतात. मित्राच्या विधवा पत्नीला संस्थेत हेडक्लार्कची नोकरी आमदाराने दिलेली असते, ही घटना स्पष्ट असते. आमदार निधीतून घेतलेल्या संगणकापैकी एक आमदाराच्या घरी, एक मुझुमदारच्या घरी, एक पडवळच्या घरी जातो व उरलेले शाळेत येतात. परीक्षेच्या काळात सवर्णांच्या मुलांना सोडून दिले जाते, पण दलितांच्या मुलांची कॉपी केस केली जाते. पदरी असो नसो, मुझुमदारची रखेल म्हणून नारायण पडवळच्या बायकोला शाळेत नोकरी मिळते व तिच्याच साठी जोशी या मुख्याध्यापकाला जावे लागते. वसतिगृहातील अन्नधान्यात भष्ट्राचार होतो, शाळेच्या खरेदीत होतो, पडवळ शिक्षक असूनही त्याचे कोचिंग क्लासेस राजरोसपणे चालू असतात. त्याच्या क्लासला येणाऱ्यांना पास केले जाण्याची हमी असते. कॉपी प्रकरणात सोडून देण्यात येते. जोशी मुख्याध्यापक क्वार्टर सोडून गेल्याने रिकामे क्वार्टर आनंद व सुषमा यांना कसं देता येईल, याचे राजकारणी मनसुबे रचले जातात. दलितांवर हल्ला होऊन प्रकरण पेटते तेव्हा आमदार समझोता करून चलाखपणे मिटिंग घेऊन, प्रकरण मिटवतात, पण कांबळे गुरुजींना न कळू देता संस्थेतून काढून टाकतात. कॉपी प्रकरणात खोट्या जबान्या, तक्रारी लिहून घेतल्या जातात. खोटे पुरावे उभे केले जातात. गावाला चिथावले जाते.

एका शिक्षणसंस्थेच्या भोवती असणारी भ्रष्ट, नादान, निर्लज्ज संस्कृती उभी करण्यात लिंबाळे यशस्वी झाले आहेत. चिरडली जाणारी बालमने आणि त्यांच्यावर सुसंस्कार करू शकणारे शिक्षकच जेव्हा 'बदला' संस्कृतीचे बळी ठरतात, तेव्हा शिकवणे विसरून तेच स्वत: शिकतात, आपली कातडी वाचवायला, भ्रष्ट संस्कृतीला सहाय्यभूत व्हायला. शिक्षणाचे काहीही होवो, आपण आपल्यापुरते पहायचे याची खूणगाठ बांधणारे सर्व शिक्षक, इथे, या कादंबरीत, प्रतिनिधिक रुपात वावरताना दिसतात.

आमदार पिसाळ तीनदा निवडून गेला आहे. तो मुरलाय. मुंबईत राहून तो गावच्या राजकारणावर वचक ठेवतो. हा वचक ठेवण्याचे एक मोठे आश्रयस्थान म्हणून शाळेला वापरतो. तेथील नोकरांना वापरतो. स्वत: अडचणीत येताच, इतरांच्या माना अडकवून तो सहीसलामत सुटका करून घेतो.

'ह्या शिक्षणव्यवस्थेत अनेक दलित शिक्षक उद्‌ध्वस्त झाले आहेत. अनेक दलित विद्यार्थी आयुष्यातून उठले आहेत, त्याचे ऑडिट', श्री. शरणकुमार लिंबाळे या कादंबरीत दौलत कांबळे, आनंद काशीकर, यांच्या माध्यमातून अचूक करतात. आनंदच्या जीवनाची तर शोकांतिकाच होते, पण त्याही आधी तो रोज मरत असतो. जात उघड न केल्याने, त्याला जातीवर उगारली जाणारी सवर्णांची दूषणे परवता येत नाहीत. 'मतिमंद मुलासारखा' तो ती दूषणे ऐकून घेतो. दलित वस्तीत इच्छा असूनही जाऊ शकत नाही. मिसळू शकत नाही. संघर्षात भूमिका घेऊ शकत नाही. कांबळे गुरुजींच्या मागे अथवा वसतिगृहातील दलित विद्यार्थी यांच्या मागे तो उभा राहू शकत नाही. कॉपी प्रकरणात आयुष्यातून उठवलेल्या दलित विद्यार्थ्यांची बाजू घेऊ शकत नाही. तोंड दाबून बुक्के सहन करणाऱ्या आनंद काशीकरचे चित्रण, हे आजच्या भ्रष्ट, नकली व रोगट शिक्षण व्यवस्थेवरचं मार्मिक व मर्म भेदक भाष्य ठरते.

दौलत कांबळे हा गावातल्या दलित वस्तीतला पहिला पदवीधर. शाळेतलं काम करताना तो चुका करीत नाही. चलाखपणे तो सापडत नाही. कॉपी प्रकरणात

दलित वस्तीवर झालेला हल्ला, दलितांनी नाकारलेली गावकीची कामं, इत्यादी अनेक प्रसंगात तो धीरोदात्त नेतृत्व देतो. त्यांच्यावर भ्रष्ट यंत्रणा चारित्रहननाचे आरोप करते व त्यातून गावात तणाव निर्माण होतो, दलित वस्तीतली विहीर निर्माण करताना संघर्ष निर्माण होतो, लग्नाची वरात देवळात जाताना संघर्ष होतो आणि हे वाद विकोपाला जाऊन, आमदाराला त्याचा त्याच्या राजकीय प्रवासात जेव्हा त्रास होतो, तेव्हा गोडी गुलाबाने, आमदार त्याच्या खांद्यावर हात टाकून वगैरे, ते संघर्षमय वातावरण मिटवून टाकतात, पण अत्यंत क्रूर राजकीय खेळी खेळून संस्थेतून काढून टाकतात. बिनपगाराचे, हालाखीत ढकलेले कांबळे गुरुजी या व्यवस्थेत पैशा अभावी, कुटुंबाच्या आर्थिक चणचणीत पुरते ढासळून जातात. उद्ध्वस्त होतात. लाचार होतात. कांबळे गुरुजींची लाचारी, उद्ध्वस्तपण, डॉ. लिंबाळे वास्तवतेने रेखाटतात. ते कुठेही स्वप्नील आशावाद उगाच चित्रीत करीत नाहीत. चिडलेल्या, यंत्रणेचे स्वरूप सरळ सरळ ते आपल्या समोर पेश करतात.

एका संघर्षमय आयुष्य जगणाऱ्या शिक्षकाची होणारी घुसमट आणि जात चोरून ठेवल्यामुळे होणाऱ्या दुसऱ्या सज्जन शिक्षकाची कोंडी, हा या कादंबरीतला महत्त्वाचा धागा, लिंबाळे शिक्षण व्यवस्थेच्या मोठ्या पटावर रेखाटत असले तरीही, या सर्व कथानकामागे किंवा उपकथानकांच्याही मागे, किंबहुना असे म्हणता येईल की, त्यातील महत्त्वाच्या पात्रांच्या मागेही, झुंडीची पार्श्वभूमी आहे. ती झुंड कोणती? कशी आहे ही झुंड?

**'झुंडी'चे स्वरूप आणि रूप :**

'झुंड' या नावामुळे झुंडीचे मानसशास्त्र, झुंडशाही, त्या झुंडीचे समाजातले नित्य दिसणारे विहत दर्शन, पानोपानी कादंबरीत असेल असं वाटत असलं, तरीही तशी झुंड कादंबरीत नाही.

उत्तर भारतीयांवरील हल्ल्यांमुळे निर्माण झालेली दहशत व त्यामुळे वातावरणात आलेली भयग्रस्तता, कादंबरीच्या प्रारंभी आली असली तरी, आणि पुढे कादंबरीत वेळोवेळी निर्माण झालेले दलित-सवर्ण संघर्ष अत्यंत टीपेला पोहोचलेले असले, डोकी फुटलेली जरी असली, पोलिसांनी अनेकांना पकडून नेलेले असले तरीही, त्या रागामागे, वैमनस्यामागे 'झुंडशाही' दडलेली नाही. मनोवृत्तीत असणारी घृणा, मत्सर, द्वेष व त्यातून निर्माण झालेला संघर्ष असे याचे स्वरूप आहे. आमदार काय, त्याचा मेव्हणा मुझुमदार काय, त्यांचे पिट्टे काय, किंवा नारायण पडवळसारखा जातीयवादी व दलित द्वेष्टा शिक्षकही झुंडीला झुंडशाहीचा विचार देत नाही. अगदी आनंद काशीकरच्या फाशीमध्ये पुढाकार घेणारा नारायण पडवळ आणि गावातले टोळभैरवही घृणेचे बळी ठरतात. पोलिसांच्या हस्तक्षेपात सर्व काही सरळ येतात. कायदा मानला जातो.

झुंडशाहीला नेहमीच नेतृत्त्व लागतं. पेटून उठवेल असा कडू जहर विचार लागतो. झुंडीच्या झुंडी निर्माण व्हाव्यात, असा अंगार भडकवावा लागतो. त्यात द्वेष, मत्सर, हेवा, अन्याय झाल्याची भावना, यांचे तेल सतत ओतत राहावे लागते. चिथावणी, रेटा, आक्रमकता, भडकपणा, सटकपणा, बिनधास्तपणा, अतार्किक विधाने, खोटा इतिहास, बेधुंद विधाने, अशा अनेकानेक क्लृप्त्या करून झुंडीला झुंडशाहीत लोटावे लागते. ते अग्नीकुंड पेटते राहील असे पहावे लागते. त्यातून मग हल्ला, दंगल, खून, जाळपोळ, मारामाऱ्या अशा विविध मार्गांनी झुंडशाही आपली दहशत बसवते. दंगली संपल्या तरी झुंडशाही संपत नाही. मरत नाही. पोलीस, शासन, संस्था आणि लोक यांच्यावर हुकमत राहावी, याच स्वार्थी हेतूने झुंडशाही खेळवली जाते. झुंडीला झुंडशाहीचा सम्राट लागतो. त्या सम्राटामागे वा त्याच्या इशाऱ्यावर झुंडशाही समाजात हातपाय पसरते. कायदा,

सुव्यवस्था यांचे तीनतेरा वाजवण्यातच झुंडशाहीला समाधान प्राप्त होते. त्यातूनच झुंडशाही आपला हेतू साध्य करायला पहाते. राजकारण खेळू पहाते.

डॉ. शरणकुमार लिंबाळे यांच्या 'झुंड' या कादंबरीत असं झुंडशाहीला जन्म देईल असं नेतृत्व नाही. आमदारही असलं राजकारण करीत नाही. तो बारीक सारीक संस्थातत्मक पातळीवरच खेळताना दिसतो. त्याच्यासमोर इतर तर, अगदीच नगण्य ठरतात. मग 'झुंड' हे शीर्षक का? ही झुंड कसली? लिंबाळेंना कोणती झुंड अपेक्षित आहे?

डॉ. लिंबाळे, झुंडशाही निर्माण होण्यासाठी, प्रत्येकाच्या मनात जी झुंड धगधगत असते, ती पकडण्याचा, रेखाटण्याचा प्रयत्न करतात आणि त्यात ते पूर्णपणे यशस्वी होतात. प्रत्येकाच्या मनात एक प्रकारचा द्वेष, राग, मत्सर, हेवा, दडून बसलेला असतो. तो व्यक्तिगत पाळीवरचा जसा असतो, तसाच तो सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक प्रश्नांवर, ते प्रश्न निर्माण करणाऱ्या व्यक्ती-संस्थांवरही दडलेला असतो. अनेकदा तो दडपून टाकलेल्या अवस्थेत असतो. मनाच्या पृष्ठभागावर कधी तो डोकावतो, तर कधी ग्रुपमध्ये, घरात गप्पांमध्ये, तर कधी कधी चिडीच्या अवस्थेत मन संवादांमध्ये, तो खदखदत बाहेर पडतो. त्यातून भांडणे होतात, दोन गटात बाचाबाची होते, कधी मारझोडही केली जाते, पण जोपर्यंत कोणी एक या खदखदीचा वापर करत नाही, तोपर्यंत या झुंडीचे प्राबल्य व्यक्तिगतच उरते. झुंडशाहीकडे ही खदखद वळवली जात नाही, तोपर्यंत सारेच अटोक्यात असते. पोलीस यंत्रणा, प्रसार माध्यमांच्या भीतीमुळे अतर्क्य गोष्टी घडत नाहीत. लिंबाळे नेमकी हीच अवस्था मांडू पहात आहेत.

मनातली खदखद कशी जहरी असते, ते लिंबाळे नारायण पडवळच्या रूपाने मांडतात. दोनदा ॲट्रॉसिटीच्या फटक्यामुळे तुरुंगात जाऊन आलेला नारायण पडवळच्या नसानसात महार समाजाविषयी द्वेष भरलेला आहे. खालच्या जातीविषयी, कष्टकऱ्यांविषयी मत्सर भरलेला आहे.

आनंद काशीकरला, नारायण पडवळ सांगत असतो की, ''सर, तुम्हाला सांगतो. एकदा माझ्याबरोबर आमदारांचा ड्रायव्हर जेवायला बसला होता. मी त्याचा अपमान करून त्याला माझ्या जवळून उठवले होते. तो ताट घेऊन दुसरीकडे जाऊन बसला होता. आणखी एक प्रसंग सांगतो. एकदा आमदाराचा ड्रायव्हर माझ्याजवळ झोपला होता. रूममध्ये जागा अपुरी होती. मला रात्रभर झोप आली नाही. ड्रायव्हर आपल्या शेजारी झोपतो हे मला सहन होत नव्हतं. मी रात्री अनेकवेळा उठून ड्रायव्हरकडे पाहायचो. मला त्याची घृणा वाटायची. मेलेलं गाढव आपल्या शेजारी पडले आहे, त्याची दुर्गंधी सुटली आहे. आणि माझा जीव गुदमरतोय असं मला वाटू लागलं होतं. मी त्या रात्री झोपू शकलो नाही. ईश्वराने केलेली ही व्यवस्था आहे. ईश्वर मोठा की कायदा? परंपरा मोठी की घटना? व्यवस्था मोठी की खालची जात?'' (पृ. ५९)

नारायण पडवळची ही विचारधारा एकतर झुंडशाही निर्माण करणारी ठरू शकते, (कादंबरीत, शेवटी तो आनंदला फासावर चढवतो, ते याच मनातल्या झुंडीला, झुंडशाहीचं रूप प्राप्त झाल्याने) किंवा एखाद्या नेतृत्वाच्या मागे आपल्या मनातली झुंड घेऊन पडवळसारखी माणसं झुंडशाहीत येऊन दाखल होतात. अशा झुंडीच्या झुंडी पेटून उठवता येतात तेव्हा तिथे सामूहिक झुंडीचे सहाय्य असते. कादंबरीतला दलितांवरचा अत्याचार, असाच पडवळसारख्या समविचारी माणसांच्या मनातल्या झुंडीला वाट मोकळी करून देताना, घडून आलेला असतो.

लिंबाळे ही प्रत्येकाच्या मनातली 'झुंड' मांडू पहात आहेत. ती नारायण पडवळमध्ये तीव्र आहे, पण

ती आमदार, मुझुमदार, पडवळची बायको, मारुतीच्या देवळात पत्ते कुटत बसणारे बेकार तरुण, पुजारी अशा अनेकांच्या मनात जातीबद्दलचा द्वेष झुंडीच्या रुपाने घोंगावतो आहे. त्यातून कधी सामूहिक अत्याचार होतोय, तर कधी कायदा न पाळण्याची कृती घडते आहे.

कादंबरी याचमुळे वेगळी ठरते. प्रत्येकाच्या मनात दडून बसलेल्या झुंडीला जशी वाट हवी असते, तशीच तिला शमवण्यासाठी कोणता तरी व्यक्तिगत, कौटुंबिक आघात किंवा हादराच व्हावा लागतो. विवेकवाद कुचकामी ठरतो. सुषमाच्या गर्भात आनंद काशीकरचा अंकूर असणे व तो तिने न मारणे, वाढवण्याचा निश्चय करणे, हीच नियती नारायण पडवळसारख्या मनोवृत्तीच्या माणसाला टाळ्यावर आणायला गरजेची असते. कायदा, विवेक, माणुसकी तिथे कुचकामी ठरते. बहीणच त्याला धडा देते. शेजारी झोपलेला ड्रायव्हर ज्याला आवडत नाही, त्याला त्याच्या बहिणीच्या कुशीत एका महाराचा अंकूर रुजतो, यासारखे विष कसे पचवता येणार? पण नियतीचा खेळ वेगळाच असतो. तो कुणाला समजलाय? सुषमाच्या रूपाने त्याच्यावरचा सूड त्याच्याच घरात, पोटात वाढतोय या सारखे दुर्दैव कोणते?

**'काशी' नावाची मिथ् :**

'झुंड' या कादंबरीला आणखी एक परिमाण आहे आणि ते पौराणिक मिथकाचे. सुदामा व सावित्री यांच्या मुलाची, आनंदची, जात 'माणूस' हीच कागदोपत्री असली तरी त्याला आडनाव आहे. ते आहे काशीकर. या नावाने अनेकांचा घोटाळा होतो. काशीकर या आडनावामुळे आनंद ब्राह्मणच असल्याचे अनेक जण गृहीत धरतात. लेखक या आडनावामुळे एका पौराणिक मिथकाचा वापर करून ही कादंबरी वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवतो.

'काशी' या तीर्थक्षेत्रावर भारतीयांची श्रद्धा आहे. मोक्षदायक, एक महत्त्वाचे ज्योतिर्लिंगस्थान, विश्वनाथांचे वास्तव्य, गंगा-यमुना व सरस्वती यांचा त्रिवेणी संगम असणारे प्रयाग स्थान, शैव क्षेत्र, अशा अनेक बाबींमुळे काशीला मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. विशेष म्हणजे काशी हे शिवाच्या त्रिशुलावर वसले असून, प्रलयकालीही काशीचा नाश नाही, अशी पुराणात काशीचे महत्त्व सांगितले आहे. अशा काशी या पवित्र स्थानाचे आडनाव लावणारा, किंवा काशीवासिय मात्र अपवित्र ठरतो. प्रलय काहीही नाश न पावणाऱ्या काशीतला एक काशीकर मात्र झुंडीच्या प्रलयकाळात मारला जातो.

धर्मपीठ व विद्यापीठ म्हणून ख्याती असणाऱ्या काशीतल्या एका काशीकरासाठी सर्व धर्मग्रंथ पोकळ ठरतात, तर कोणत्याही विद्यापीठात माणुसकीचा साधा धडा शिकवला जात नाही. 'झुंडी' ला रोखण्याचे तत्त्वज्ञानही कुचकामी ठरते. संस्कृती, विद्या व तत्त्वज्ञानाचे माहेर घर असणाऱ्या काशीतल्या एका काशीकराला कोणत्या संस्कृतीला तोंड द्यावे लागते!

'काश्यां तु मरणान्मुक्तिः' अशी काशीची शास्त्रात ख्याती आहे. काशीत जो प्राणी मृत्यू पावतो, तो मुक्त होतो. 'परब्रह्माचा किंवा मोक्षमार्गाचा प्रकाश करणारी ती काशी होय' असे वर्णन केले गेले आहे. आनंद काशीकर, काशीचे नाव धारण करणारा असला तरी मोक्षमार्गावर जात नाही तर मृत्युमार्गावर लोटला जातो, धाडला जातो.

काशी हा दोन संस्कृतीतील सनातन झगडा तर नाही ना? मुस्लिम राजवटीत औरंगजेबाने काशीवर धाड टाकली. विश्वेश्वराच्या मंदिरासकट अनेक मंदिरे उद्ध्वस्त झाली. बुद्धकाळात काशीला वेगळेच महत्त्व प्राप्त झाले होते. वैदिक व बौद्ध यांच्यातल्या झगड्यात काशीला महत्त्व प्राप्त झाले होते, पण इतिहास असे सांगतो की, बुद्धाने पहिले प्रवचन काशी जवळच्या मृगदान किंवा सारनाथ येथे केले होते. अशा नगरीचा एक नवबौद्ध

झुंडीत मारला जातो हे विदारक सत्य लेखक प्रतीकात्मकपणे मांडतो आहे. एका नवा सांस्कृतिक झगडा कादंबरीत मांडला जातोय.

'प्रयाग' या संगमात गंगा-यमुनेचा प्रवाह स्पष्ट आहे, तर सरस्वतीचा प्रवाह मानला गेलाय. ब्राह्मण व मराठा हे इथल्या सत्तेच्या प्रवाहातले दोन मुख्य प्रवाह आणि मागासवर्गीय व इतर जाती, हा इथल्या सत्तेच्या प्रवाहात अदृश्यपणे दूर ठेवलेला प्रवाह असा एक अर्थ होतो तर, दुसरा अर्थ, सत्तेचा प्रवाह नेहमीच स्पष्ट असतो तर इतर कोणत्याही प्रवाहाने त्यात उतरून संपूनच जायचे असते. याला सत्ता पवित्र नाव देईल, मोक्षाची आकांक्षा दाखवेल, तुम्ही बोलायचे नाही. असा दुसरा अर्थ.

डॉ. लिंबाळे या सर्व प्राचीन सांस्कृतिक झगड्याला एक नवा अर्थ देतात. केवळ आडनावाचा वापर करून त्यांनी हे साधले आहे. आनंदचे मूळ आडनाव काय? तो खरंच काशीचा रहिवासी आहे का? हे प्रश्न फोल ठरतात. 'काशी' चे नाव लावणाऱ्या कोणत्याही माणसाच्या संस्कृतीची राख रांगोळी होते, हे विदारक सत्य कादंबरीत ठसठशीतपणे अधोरेखित होते.

**माणूस नसलेला महार :**

शरणकुमार लिंबाळे यांनी 'जात' या घटकावरही नेमके बोट ठेवले आहे. जोपर्यंत आनंद काशीकर ब्राह्मण समजला जातो तोपर्यंत तो दलित असूनही देवांना, देवळांना, माणसांना, सत्तेला, कुटुंबव्यवस्थेला चालतो. त्याच्याशी रोटी-बेटी व्यवहार होतात, केलेही जातात. शिक्षक म्हणून तो उत्तम ठरतो. ब्राह्मणांना तो संघाचाच वाटतो. मात्र जेव्हा त्याची जात उघड होते तेव्हा मात्र तीच व्यक्ती, तोच देह, तेच शब्द, तीच भाषा, तीच संस्कृती, अपवित्र होते. विटाळली जाते. मग विचारात अपवित्रता आहे की माणसात? बघण्याच्या दृष्टीत दोष आहे की माणसाच्या लपवण्यता? लिंबाळे हे प्रश्न आनंदच्या माध्यमातून जळजळीतपणे ठेवतात.

'माणूस' ही जात लावणाऱ्या व मानणाऱ्या आनंदला शेवटी आपली माणूसपणाची जात टाकून द्यावी लागते व खरी जन्माने मिळालेली जात लावावी लागते. जिथे 'माणूस' ही जात लावण्याच्या कृतीचा जाहीर सत्कार केला जातो, तिथेच जाहीरपणे दलितत्त्व सिद्ध झाल्याने फाशी जावं लागतं.

सर्वांची माफी मागत आनंद गावभर हिंडतो आणि प्रत्येकाला सांगतो की, ''मी माणूस नाही हो, मी महार. माझी जात माणूस नव्हती, महार होती. मी ती लपवून ठेवली.'' किती क्लेशकारक विधान आनंदच्या मुखातून लेखक करतो आहे. माणूस बिनमहत्त्वाचा, त्याची जात महत्त्वाची. 'माणूस नसलेला महार' हे या संस्कृतीवरचे विदारक भाष्य लिंबाळे करतात, तेव्हा आनंद या नायकाची शोकांतिका टिपेला गेलेली असते. मरण तेव्हाच आलेले असते. फाशी हा उपचार ठरतो. जात समजल्याबरोबर समाज, विद्यार्थी, सहकारी, गावकरी यांच्या दृष्टीने आनंद मरतो.

**कादंबरीतील वेधक भाषाशैली :**

लिंबाळे यांची भाषाशैलीही विशेष दखल घ्यावी अशी आहे. गौरी नावाच्या मुलीच्या मनात आनंद विषयी पहाता क्षणीच एक विशेष जागा निर्माण होते. त्याचे वर्णन लेखक करतात. ''तिच्या मनात त्याच्यासाठी कुठं तरी खोल जागा निर्माण झाली होती. अगदी बागेतल्या रिकाम्या बाकड्यासारखी.'' किंवा ''गौरीचं वाक्य त्याच्या डोक्यात शाळेची घंटा वाजावी तसं वाजत राहिलं. तो आपल्या मन:स्थितीला खिळे ठोकून ठाकठीक करत होता.''

'त्याचा चेहरा कोऱ्या फळ्यासारखा होता', 'जोशीच्या चेहऱ्यावर दशक्रियेची गर्दी जमली होती', 'आनंदच्या प्रतिवाद ऐकून पडवळच्या चेहऱ्याला तडे गेले होते. त्याचा चेहरा भूकंपग्रस्त प्रदेशासारखा दिसत होता,' 'आनंद मतिमंद मुलासारखा बसून होता', 'समुद्र

म्हणजे त्याला अश्रूंचे विराट रूप वाटले होते. तो समुद्राला भ्याला होता', 'पेगमध्ये बर्फ तरंगावं तसा तो तिच्या विचारात तरंगत होता', 'बाजीरावचा चेहरा शेणानं भरल्यासारखा दिसत होता', 'श्रीधरच्या चेहऱ्यावर जणू कावळ्यांची रांग बसली होती', 'पुजारी मात्र ओसाड मंदिरातल्या जुन्या दगडी मूर्तीसारखा जागेवर उभा होता', 'पुराणातल्या कथांमधून प्राचीन वासना जांभई देत जागी झाली', 'तो बर्फासारखा तिच्यात विरघळला. ती मेंदीसारखी त्याच्या मनात रंगली', 'त्यांच्यात साथीच्या रोगासारखं मौन पसरलं', 'तिची देहबोली एक नवा ग्रंथ लिहीत होती', 'अंधार तरुण झाला होता', ही काही आणखी उदाहरणे जर बघितली तर डॉ. लिंबाळे यांच्या भाषाशैलीतील नावीन्याची, वेगळयाच चमकदार प्रतीकांची, जन्या प्रतीकांना नवा साज चढवणारी शैली अत्यंत वेधक ठरते.

काही ठिकाणी ती अनाकलनीयही होते. उदा. 'तिचा चेहरा जातीत मुरलेल्या लोणच्यासारखा दिसत होता' (पृ. १०४) 'जातीत मुरलेले लोणचे' कसे असते याचा अर्थबोध होत नाही. मात्र एकूणच शैली, बोलीची - संवादाची भाषा प्रवाही आहे; पात्रांच्या तोंडी उपरी वाटत नाही. किंवा उगाच भपकेबाज, ठसकेबाजही होत नाही.

काही ठिकाणी लिंबाळे यांच्या गफलती झाल्या आहेत. त्याला संपादनाची गरज होती. उदा. नारायण पडवळचे वडील मरतात. त्यांच्या प्रेतयात्रेला पडवळला जातीबाह्य लग्न केल्याने येऊ दिले जात नाही. तो बायकोला घेऊन बस स्टँडमध्ये बसून राहतो. तिथे लेखक असं लिहितात की, ''दुपारीच पडवळच्या वडिलांची माती झाली. प्रेताला स्मशानात पुरलं.'' (पृ. १०६) ९६ कुळी मराठा खानदानात प्रेताचे दहन होते की दफन?

गावचे बेकार तरुण मारुतीच्या देवळात पत्ते कुटत असतात. त्यांच्यात जयराम पुजारीही सामील असतो. काही तरी उद्योग हवा म्हणून हे टोळकं राम मंदिर गावात बांधायच्या प्रस्तावावर पत्ते खेळता खेळता चर्चा करतात. या चर्चेत जयराम पुजारी गंभीर होतो. कारण 'प्रभु रामचंद्रांच मंदिर झालं, तर आपल्या मंदिरात कोण येणार याची चिंता' त्याला (पृ. ४३ वर) वाटत राहते आणि पुढे मात्र मंदिर बांधणीच्या कल्पनेला तो चर्चा करायला लागतो. इतकेच नव्हे तर 'आपली कल्पना मूळ धरते आहे ह्याचा त्याला मनस्वी आनंद' होतो (पृ. १०५ वर) हा विरोधाभास नाही का?

नारायण पडवळ दुसऱ्यांदा जेलमध्ये जातो, तेव्हा त्यांच्याच घरात राहणाऱ्या आनंद काशीकरचा साधा उल्लेखही कुठे येत नाही. पडवळची बायको आमदाराचा मेव्हणा मुझुमदार याचा आधार शोधते आणि त्याच्या संबंधात अडकते. ह्या अत्यंत कठीण काळात आनंद पडवळ कुटुंबात कुठेच वावरताना, जेवताना, झोपताना दिसत नाही. वस्तुत: कर्ता पुरुष तुरुंगात असताना एका एकाकी बाईबरोबर एक तरुण कसा काय राहतो? तोही असल्या सनातनी गावात?

अशा काही त्रुटी सोडल्या तर 'झुंड' ही कादंबरी दलित साहित्यात आणि मराठी कादंबरीत उजवी ठरते. 'काशी' च्या प्रतीकात्मक सौंदर्याने ती उजळून निघते. जाती व्यवस्थेचे वर्म पकडते. माणूसपणा पेक्षा 'जात'च भारतीय संस्कृतीत सर्वस्व ठरते, यावर भाष्य करते. 'झुंडी' ची मानसिकता अधोरेखित करते. अशा वास्तवदर्शी कादंबरीची चर्चा फारशी होत नाही, हेच इथल्या ग्रंथ संस्कृतीचं विदारक सत्यही ठरतं.

**डॉ. प्रदीप कर्णिक**
फ्लॉवर व्हॅली, नारळीपाडा,
हायवे, ठाणे - ४०० ६०१
दूरध्वनी : २५४७६१४५

●●●

कोणतीही गोष्ट हवीहवीशी वाटणे, याचे नाव काम.

# दिल्ली, आग्रा, मथुरा, वृंदावन, वैष्णवदेवी

*दिशाच्या हितचिंतक व लेखिका श्रीमती आशाताई भिडे यांनी केलेले हे सहलीचे वर्णन. वर्णनात चित्रात्मकता असल्याने हे वर्णन वाचून आपणही जायला हवं असं मनात आल्याशिवाय रहात नाही - संपादक*

ठाण्यातील विष्णुनगरातील श्री. व सौ. गलांडे हे अनेक सत्संग सहलीसाठी प्रसिद्ध आहेत. खाजगीरीत्या ते ''कुरुक्षेत्र, हरिद्वार, ऋषीकेश, शुकताल'' (भागवत सप्ताहासह) येथे दहा दिवसाची तसेच ''द्वारका, सोरटी सोमनाथ'' (भागवत सप्ताहासह) येथेही दहा दिवसाची सत्संग सहल दरवर्षीच आयोजित करतात. मी या दोन्ही सहलींमध्ये सहभागी झाले होते. अतिशय उत्तम व्यवस्था, माफक खर्च, आपुलकीने, जातीने चौकशी यासर्वांमुळे मी तिसऱ्यांदा त्यांच्याबरोबर 'दिल्ली, आग्रा, मथुरा, वृंदावन, काश्मिर, वैष्णवदेवी' या सहलीला जाऊन आले.

कुठल्याही सहलीच्या दहा, पंधरा दिवस आधी ते सगळ्यां पर्यटकांना एकत्र बोलावतात नि संपूर्ण सहलीची माहिती देतात. शिवाय छापील पत्रक पण देतात (सहलीचे वेळा पत्रक) त्यांचे सारे काम अतिशय शिस्तबद्ध असते. काश्मिर सहलीसाठी आम्ही सर्व दहा एप्रिल दोन हजार नऊला ठाण्याहून दुपारी ४.४० ला लष्कर एक्स्प्रेसने निघालो. आणि दुसऱ्या दिवशी ११ तारखेला आग्र्याला १२.४५ ला पोहचलो. तिथे हॉटेलवर जायला बसची व्यवस्था केलेली होतीच. सर्व सामान खोलीवर ठेऊन जेवणं आटोपून त्याच बसने 'ताजमहाल' पहायला गेलो. 'ताजमहाल' दिवसा पहायला कमी तिकिट व रात्री चांदण्यात पहायला जास्त तिकिट होते. आम्ही दिवसाच गेलो. बसेसच्या, गाड्यांच्या रांगाच रांगा रस्ताभर लागलेल्या होत्या. त्यामुळे आमची बस खूपच मागे पार्क करावी लागली. 'सत्संग सहलीला' नेहमी जेष्ठ नागरिकच जास्त असायचे. साठ ते पंच्याहत्तरीचे. पण ही काश्मीर सहल असल्यामुळे बरीच तरुण मुले मुली ही ज्येष्ठांबरोबर होती. कुठलेही ठिकाण बघायला बरेच चालावे फिरावे तर लागतेच अगदी गाडी घोडे असले तरीही. नि यावेळी बस तर खूपच मागे उभी राहिली. तिथून ताजमहल पर्यंत पायी चालत येणे ज्येष्ठांना कठीण होते. शिवाय गेट पासूनही आत खूप चालावे लागणार होतेच. बऱ्याच ज्येष्ठांनी मिळेल ते वाहन गेट पर्यंत जायला केले. मिनी बसेसची सोय ही होती.

मिनी बसमधून गेट शी उतरलो. समोर जगातले भव्य दिव्य असे आश्चर्य पांढरे शुभ्र संगमरवरी शिल्प दृष्टीस पडले. ''बादशाहाच्या अमर प्रीतीचे मंदिर एक विशाल। यमुनाकाठी ताजमहल॥'' हे गजानन वाटवे यांच्या गाण्याचे शब्द मनात रुंजी घालू लागले. ताजमहल समोरची बाग तसेच पाण्यासमोर दिसणारे ताजमहालचे प्रतिबिंब वगैरे सगळे पाहून वर मुमताज महलचे कबरस्तान बघायला गेलो. तिथे तर खूप मोठ्या रांगा लागल्या होत्या. खेचाखेच ढकलाढकली चालू होती. तरी तिथे पोलिस होते आत सोडायला, म्हणून बरे. बऱ्याच प्रतिक्षेनंतर आत धक्काबुक्की करीत आत प्रवेश केला. मोठी कबर होती त्यावर हिरवे वस्त्र घातलेले होते. लोक तिथे चादरी वाहत होते. आपल्या मंदिरातल्या बडव्यांसारखे इथेही जे बडवे काफीर होते ते कबरीला पांढऱ्याशुभ्र लांब दाढीसारख्या केसांच्या पंख्याने वारा घालत आलेल्या लोकांना देणगी द्या, पैसे ठेवा 'अल्ला सबका भला करेगा' सांगत होते.

ताजमहालच्या मागे यमुना नदी होती. आम्ही ते शुभ्र सौंदर्य डोळ्यात तर साठवलेच पण कॅमेरात पण बध्द

केले. मग आग्रा फोर्टही हिंडून पाहिला. सर्वच किल्ले व सर्वच इमारतीचे सुंदर नक्षीदार कलाकुसरीचे बांधकाम पाहून थक्क व्हायला होत होते. इतकी वर्षे झाली तरी सर्व मुघल बांधकाम अजूनही पडझड न होता पाण्यापावसात, वादळवाऱ्यात, उन्हातान्हात भक्कमपणे उभे आहे. मोंगलांच्या इतिहासाची साक्ष होती. त्यादिवशी आग्र्यातच मुक्काम करून सकाळी नाश्ता करून पुढे फत्तेपूर शिक्रीला निघालो.

मुघलांचे शाही वैभव, शाही बागा, 'दिवाणे-ए-खास' शाही दरबार, जनानखाने, तानसेनेचे स्वर्गीय सूर जिथे घुमायचे ती अप्रतिम शाहीबाग, चष्मेशाही वगैरे सकाळीच सर्व उरकून दुपारी जेवण होऊन मथुरा, वृंदावनला निघालो. मथुरेला श्रीकृष्णाची अनेक मंदिरे बघितली. श्रीकृष्णाचं जन्मस्थळ बघितलं. तिथे गाईड आम्हांला मंदिराची माहिती देत होता. वसुदेवाचं पण स्वतंत्र मंदिर होत. तिथे तर गाईडने मेहनत पूर्वक आपल्या पितरांसाठी इथे पाचशे हजाराचे दान द्या, त्यांच्या नावाने आम्ही इथे गरीबांना अन्नदान करू असे सांगत लोकांना भुलवले. बऱ्याच जणांनी तेथे दान दिले. आयोजकांनी आधी सर्वांना याची कल्पना दिली होती की, मंदिरातील ह्या बडव्यांपासून सावध रहा. ते तुम्हांला खुप बुडवतील. नंतर वृंदावनला गेलो. मथुरेत कृष्णाच्या बाललीला नि वृंदावनात गोपींबरोबरच्या रासलीला रंगल्या ते मथुरा वृंदावन पहाताना धन्य झाल्यासारखे वाटले, वृंदावन मध्ये 'इस्कानचे भव्य राधाकृष्ण मंदिर' पाहिले. मंदिराला चढून जायला खूप पायऱ्या होत्या. भाविक लोकांची मंदिरात खूप गर्दी होती सर्व सभामंडप गच्च भरला होता. एका विशिष्ट वेळी मंदिरातील मूर्तीवरील पडदा बाजूला होणार होता नि लोकांना देवाचे दर्शन होणार होते. अखेर पडदा उघडला. सर्वांना दर्शन घडले. दर्शन घेऊन पायऱ्या उतरून खाली आलो. समोरच एक गुफा बनवली होती. ती पहायला तिकीट काढून गेलो. तिथे कृष्णाच्या बाललीलांचे सुंदर पुतळे होते. सगळे पाहून झाल्यावर रात्रीचा मुक्काम तेथेच होता.

तेरा तारखेला नवी दिल्लीला जायला सकाळी ७.३० ला निघालो. दिल्लीला 'इंडिया गेट', पार्लमेंट, प्रेसिडेंन्ट हाऊस, लोटस टेम्पल, राजघाट, इंदिरा गांधी घाट, नेहरू घाट वगैरे बरीच ठिकाणे पाहिली. नि तेथून रात्री ८.४५ ला जम्मू तावी एक्स्प्रेसने जम्मूला निघालो ते सकाळी ६.१५ पोचलो तेथून पुढे बसने 'कतरा'. रात्री थंडीने गारठलो. नंतर सकाळी वैष्णव देवीला आधी बसने व पुढे हेलिकाप्टरने गेलो. हा अनुभव नवीनच होता. तेथून पुढे मंदिरापर्यंत जायला घोडा किंवा पालखी खुर्चीची सोय होती. किती पायी चालावे लागेल किती वेळ लागेल याची कल्पना दिली होती. अंदाज नसल्यामुळे (तरी घोडेवाले म्हणत होते खूप लांब आहे 'तुम चल नही सकोगे' तरी घोड्यावर बसायचीसुध्दा भीती वाटत होती. पालखी म्हणजे खुर्ची त्यात एकालाच बसता येणारे होते. ती चार जणं खांद्यावरून वाहून नेणार होते. पण ती खूप महाग होती.) शेवटी पायीच जायचे ठरवले. म्हटले येतांना बघू काय करायचे. आता तर पायीच जायचे. आम्हां चार जणींचा ग्रूप होता. गटागटाने माणसे जात होती. चालायला सुरुवात तर केली. दमलो तर मध्ये थांबत होतो. चालतोय चालतोय तरी अंतर संपत नव्हते. पाय दुखून गेले. वाटले देवी आपली परीक्षाच पहातेय. देवाचे नाव घेतच एकदाचे शेवटपर्यंत पोचलो. साग्रसंगीत दर्शन घेतले. प्रसाद घेतला. देवीपुढे दक्षिणा ठेवली प्रदक्षिणा घातली आणि परतीला निघालो. आता पायी जाणे तर शक्य नव्हते. अंतराची कल्पना आता आली होती. घोड्यावर बसायला मन घाबरत होते; धीर होत नव्हता, पण बरोबरच्या तिघी घोड्यावर चढल्या शेवटी आडला नारायण ... घोड्याचे पाय धरावेच लागले. साडी नेसूनच घोड्यावर बसले. आपला तोल जातोय, पडतोय असे सारखे वाटत होते.

घोडा हलला, जरा पळायला लागला तरी घोडेवाल्या माणसाला 'मी उतरते' मला उतरायचे आहे, थांबव म्हणून मी ओरडत होते. फारच थरारक अनुभव होता हा. घोड्यावरचा फोटो काढला. जाणारे लोक परत येणाऱ्या लोकांना बघून 'जय माता दी' म्हणत होते आम्ही ही म्हणत होतो 'जय माता दी' आणि त्या आई मातेनं सुखरूप हेलिकॉप्टर पर्यंत आणून पोचवलं. पुढे बसने हॉटेलवर कतऱ्याला आलो. कतऱ्याला येताना रात्र झाली होती मुक्काम तेथेच करायचा होता. आतापर्यंत ज्या बर्फाच्छदित डोंगरांची उत्सुकतेने वाट पहात होतो ते बर्फाचे डोंगर इथे दिसतात 'ओहऽऽ किती सुंदर' उद्गार बाहेर पडले सर्वाच्या तोंडून ''आता बर्फातच राहायचे आहे. चार पाच दिवस मनमुराद आनंद लुटा, बर्फात खेळा, लोळा, पळा, डोळाभरून पहा कश्मिरची हिमशिखरं, डोंगर, दऱ्या, लेकशिकारे, झुळझुळ नद्या, नयनमनोहर बागा, काश्मिरी स्त्रिया, माणसं भारताचं नंदनवन काश्मिर'' सहलीचे आयोजक सर्वांना म्हणाले.

कतऱ्याला आम्ही जिथे उतरलो होतो ते हॉटेल बर्फाच्या डोंगरांनी वेढलेले होते. अंधार पडला होता तरी बर्फाने आच्छादलेले पांढरे शुभ्र डोंगर चमकत होते, उठून दिसत होते. हॉटेलात उतरल्यावर तिथे आपल्या धूपदानासारख्या छोट्या छोट्या शेगड्यांत विस्तव फुलवून ठेवला होता. निखारे कोळसले तर वारा घालून फुलवायचे. आम्हांला त्याची मजा वाटली. आम्ही धावतच सगळे त्या शेकोट्यांपाशी जाऊन कोंडाळे करुन बसलो तिथे 'या बसा' म्हणून कोणी एका वेटरने आमचे मराठीत स्वागत केले. आम्हांला बरे वाटेल त्या मराठी शब्दांनी केलेल्या स्वागताने. त्या एका वेटरलाच मराठी येत होते. मराठी लोकांकडून त्याने शिकून घेतले होते, असे त्यानेच सांगितले तिथे ज्यांना पाहिजे असेल त्यांना घालायला काश्मिरी ओव्हरकोट, कानटोपी, मफलर, गमबूट वगैरे भाड्याने देत होते. गरम गरम चहा प्यायल्यावर जरा बरे वाटले. तोवर रूमच्या चाव्या मिळाल्या. रात्री स्वादिष्ट भोजनानंतर सगळे गप्पगार झाले.

सकाळी वैष्णवदेवी करुन संध्याकाळपर्यंत परत कतऱ्यालाच आलो. सगळे जण खूप थकलो होतो. तरी ज्यांना खरेदी करायची होती ते दुकानात गेले. दुकानं हॉटेलच्या परिसरातच होती. बर्फाळ प्रदेशात राहायची पहिलीच वेळ असल्यामुळे हातपाय गार पडले होते, बधिर झाले होते. नाकाचा शेंडा थंडगार झाला होता. काल रात्री मऊ मऊ अंथरुणावर जाडी जुडी रजई पांघरली तरी हातापायांना उब येत नव्हती. त्यामुळे धड झोप लागलीच नाही. पहिला चहा रूमवरच मिळाला होता. आता नास्त्याची व्यवस्था अंगणात टेबल खुर्च्या मांडून उन्हात केली होती. त्यामुळे खूप बरे वाटले. प्रत्येकाचे फोटोसेशनही चालू होते. अखेर आयोजकांची शिट्टी वाजली तेव्हा सगळे जागचे हलले नि सामनासह बसमध्ये बसले. आज पंधरा तारीख, ट्रीपचा सहावा दिवस होता.

सकाळी निघालो ते दहा बारा तासांनी पहलगामला पोचलो. रात्रच झाली होती. मग दुसऱ्या दिवशी पहलगामची सौंदर्य स्थळे पाहिली नि श्रीनगरला आलो. समोरासमोर दोन हॉटेलमध्ये उतरण्याची सोय केली होती जेवण नास्ता मात्र एकत्र होते. सर्वच हॉटेल उत्तम होती. रूचकर स्वादिस्ट भोजन चहा नास्ता सगळीच व्यवस्था होती. सकाळी शंकराचार्यांच्या मंदिराला भेट दिली. डोंगरावर पायऱ्या चढून जायचे होते. पण पुन्हा कोण येणार आहे पहायला हा विचार करून जेष्ठकनिष्ठ सगळेच उठत बसत दर्शनाला गेले. तिथे शंकराचे मंदिर व शंकराचार्य जिथे ध्यानाला समाधी लावून बसायचे ते समाधी मंदिराचे दर्शनही घेतले. इतक्या उंचावरून भोवतालचा परिसर खूपच छान दित होता. मंदिरातून परत आल्यावर भोजन विश्रांतीनंतर संध्याकाळी ४ लाच मुघल गार्डन्स पहायला निघालो. बऱ्याच बागा होत्या बघायला.

आम्ही गेलो तो सिझन सफरचंदाचा आणि गुलाबाच्या फुलांचा नव्हता. त्यामुळे ते सोडून बागेत इतर खूप रंगीबेरंगी फुले होती. आम्ही मुघल गार्डन्स चष्मेशाही, शालिमार बाग, निशात बाग या सुंदर बागा पाहिल्या. कारंजी, झेंडू, जास्वंदी, बागनवेली, शेवंती तशीच इतरही सुंदर लाल, गुलाबी, पिवळी, अबोली, केशरी रंगाची टपोरी फुलेच फुले फुललेली सर्वच बागांमध्ये पाहिली. त्या सुंदर फुलांचे तसेच काश्मिरी मुलांमुलीचे, स्त्रियांचेही आमच्याबरोबर फोटो काढले.



**श्रीनगर 'शालिमार' बागेत काश्मिरी मुलांबरोबर लेखिका**

तेथील लोक सगळेच शिडशिडीत बांध्याचे उंच, गोरे दिसायला सुरेख. औषधालाही कोणी जाडं दिसले नाही. एका शाळेची ट्रीप त्या बागेत आली होती. सर्व मुस्लीम मुली पांढऱ्या ड्रेसमध्ये डोक्यावरून पांढरी चुनरी ओढून होत्या. इथल्या लोकांना आपल्या बॉलीवूडचा वारा लागलेला नव्हता. मग हॉलीवूड सोडाच. स्त्री पुरूष सर्वच इथे अगदी अंगभर कपड्यात वावरत होते. स्त्रिया मेकअप, फॅशन वगैरे काही नसताना सुध्दा निसर्गत: सुंदर होत्या पुरुषदेखील पहाडी, मर्दानी देखणे होते. शाळकरी मुलं मुली तर गोरा गोरा रंग, सफरचंदासारखे लाल गाल, काळे केस नि डोळे असलेली अशी होती खरे काश्मिरी सौंदर्य आम्ही कॅमेराबध्द करून घेतले.

तेथील एका बागेत काश्मिरी कपडे, त्याचे दागिने, फुलाचा फ्लावर पॉट सह स्त्री पुरुषांचे फोटो काढून मिळत होते. बहुतेक सर्वांनीच शंभर रुपयाला एक असा मोठ्या साइजमधला फोटो काढून घेतला. त्या प्रत्येक बागेला तिकीट काढूनच आत जावे लागत होते.

अठाराला सकाळीच नाश्ता आटोपून गुलमर्गला निघालो. सगळा बर्फाळ प्रदेश. त्या बर्फात जायला आम्हाला तिथे भाड्याने गरम ओव्हर कोट, गमबूट, वगैरे घ्यायला लागले ते घालून आम्ही सज्ज झालो. त्या गमबुटने तर पाऊलही पुढे टाकता येत नव्हते कधी घातले नव्हते. पहिल्यांदाच घातले आणि ते ही बर्फातून कोणी स्केटिंग करतांना दिसले. कोणी फळकुटाचा गाड्यावरुन जाताना दिसले. इथे नुसते फळकुट दोरीने माणसे ओढतात. फळकुटावर एकाच माणसाला बसता येते मग बसल्यावर तो माणूस बर्फावरून ती फळी ओढत ओढत नेतो. आपण पाय सरळ लांब पसरत दोरी हातात धरुन बसायचे. तो माणूस धावत ती फळी ओढत आपल्याला साधारण दोनशे रुपयात मैलभर बर्फावरुन फिरवून आणतो. एखाद्यावेळी ती फळी उतारावर उलटते सुध्दा. मी पण एकदा फळी उलटली म्हणून फळीवरुन पडले पण बर्फात पडले तरी लागले नाही. इथल्या लोकांचा गाडी ओढणे हा उपजिविकेचा धंदा आहे. पुढे आम्ही रोपवेने अगदी डोंगराच्या हिमालयाच्या शिखरावर गेलो.

थंडी मी म्हणत होती. गार वारा अंगाला झोंबत होता. चेहरा, नाकाचा शेंडा गार पडला होता. तरी सगळ्यांनी तिथे बर्फाचे गोळे एकमेकांच्या अंगावर फेकण्याचा खेळ खेळला जसं गेलो तसंच रोपने परत आलो, पुन्हा फळकुटावर बसून मैलाचा प्रदेश पार करत रस्त्यावर बसपाशी आला. रात्री श्रीनगरला त्याच हॉटेलात मुक्काम केला.

दुसऱ्या दिवशी सोनमार्गला गेलो. हाही बर्फाळ प्रदेश. उंच उंच बर्फाच्या कड्यावरुन खाली खोल खोल दऱ्या दिसत होत्या. खाली पाहताना डोळे फिरत होते. तिथे आम्हांला भारतीय सेना आगार दिसले. आपले

फौजी भाई कसे या बर्फाळ प्रदेशात राहून लढत असतील आपण काय एक दोन दिवस येतो नि परत जातो. त्यांच्याबद्दल मनात आदर व कृतज्ञता वाटली. बर्फाच्छादित हिमालय कसा असेल हे पहायची उत्सुकता होती. ती पूर्ण झाली होती. रात्री परत श्रीनगरला हॉटेलात राहिलो.

सकाळी शिकारा राईड होती. आतापर्यंत सिनेमातच हे शिकारे पाहिले होते. दाललेक मध्ये खूप शिकारे सवारी करीत होते. त्यात आम्ही पण बसलो. शिकाऱ्यात केशर विकणारे, काश्मिरी दागिने विकणारे लोकांच्या मागे लागत होते. दाललेकच्या दोन्ही किनाऱ्याला ओळीने पाण्यातच दुकाने होती; काश्मिरी दागिने, साड्या, चादरी, ड्रेस यांची.



**(काश्मिरच्या शिकाऱ्यात) धुंद धूसर धुक्यातल्या निसर्ग सौंदर्यात**

आज शेवटचा दिवस होता श्रीनगरचा सकाळची शिकाराराईड करून तेथेच स्कूबा ड्रायव्हिंग पण होते. मोटरबोटच्या मागे तराफ्यावर उभे राहून हातात धरुन जायचं. मोटरबोट पुढे ओढत नेते. हे सगळे झाल्यावर जेवायच्या वेळेला हॉटेलवर आलो. बागा पहायला गेलो त्यावेळी तर हॉटेलवाल्यांनी बागेतच आम्हा सर्वांना जेवण दिलं होतं. बसमध्ये त्यांनी सिलेंडर गॅस शेगडी व सर्व जेवण बरोबर आणून तिथे बागेत गरम करून आम्हाला दिले होते. चहासुद्धा असाच बागेत व्हायचा. शेवटच्या दिवशी खरेदीला संध्याकाळचा वेळ मोकळा ठेवला होता. सर्वांनी मनसोक्त खरेदी केली.

श्रीनगर, पेहलगाम, सोनमर्ग, गुलमर्ग, जम्मू, तावी वगैरे सर्वच काश्मिर विभागात कुठे उंच उंच इमारती दिसल्या नाहीत. लोकांची घरे फारफार तर दुमजली होती. पर्यटकांसाठीची हॉटेल आलीशान होती. बाकी तशी गरिबीच जाणवली. लोकांचा व्यवसाय फळ, फूल, काश्मिरी गालिचे, कपडे टोप्या विकणं. दागिने व केशर विकणं हाच. आम्ही ज्या हॉटेलात उतरलो होतो तिथे खाली हे कपडे, दागिने केशर विकणारे आम्ही कधी खाली उतरतो. याची वाट पहात बसलेले असायचे. मग लोकांना गंडवण्यात त्यांच्यात अहमहमिका लागायची. मुस्लीम व काश्मिरी लोक इथे लोक इथे हेच व्यवसाय करून उदरनिर्वाह करतात. काश्मिरचं निसर्ग सौंदर्य म्हणजे पृथ्वीवरचा स्वर्गच आहे तो. इथल्या थंड हवामानामुळेही असेल, पण इथलं स्त्री पुरुषाचं सौंदर्य अवगुंठित, शालीन आहे. तेही नकली रंगरंगोटी केलेलं नाही तर नैसर्गिक आहे, हे विशेष!

आता दुसऱ्या दिवशी सकाळी परतीच्या प्रवासाला निघालो. दहा दिवस कसे गेले कळलेच नाही. सर्वांचच एक कुटुंब झालं होतं इतके दिवस. आता सर्वंनाच घरचे वेध लागले होते. श्रीनगर एअरपोर्ट वरून आम्ही मुंबईला पाच तासात येऊन पोचलो. एकमेकांचा निरोप घेत पुन्हा पुढच्या सहलीत असेच भेटू या, म्हणत प्रत्येकाने टॅक्सी गाठली.

**सहलीसाठी संपर्क –** श्री. केशव गलांडे, दूरध्वनी : ०२२–२५४०१४९९, मो. : ९३२२२ ८८१४६

**श्रीमती आशा भिडे**
बी/९ विजय अर्पाटमेंटस्, आराधना
टॉकीजजवळ, ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी – २५४१०१४०
मोबाईल – ९३२४०४४७६४

●●●

# श्रीमत् आद्य शंकराचार्य प्रणित अपरोक्षानुभूति संक्षिप्त गोषवारा

*श्री शंकराचार्यांच्या अपरोक्षानुभूती या ग्रंथाच्या संदर्भातील गोषवारा देणारा हा लेख आहे - संपादक*

श्रीमत् आद्य शंकराचार्य लिखित प्रकरण ग्रंथ अपरोक्षानुभूति यात एकूण १०४ श्लोक आहेत. या ग्रंथाचे ठळकपणे तीन भाग संभवतात. पहिल्या काही श्लोकांतून साधक बनण्यासाठी कोणत्या गोष्टींची नितांत आवश्यकता आहे. याचा विचार केला आहे.

आत्मचिंतनाची सुरुवात कुठून करावी, त्यात महत्त्वाचे चिंतन कोणते असावे. ज्ञान व अज्ञान यांचा विस्तृत विचार केलेला आहे. त्यात आत्मा व शरीर यांना एक मानणे किती अज्ञानमूलक आहे हे अनेक उदाहरणांनी स्पष्ट केले आहे. ज्ञान झाल्यावर प्रारब्ध आदी कर्मफळाची निवृत्ती होते.

शेवटचा भाग हा महत्त्वाचा असून साधक बनण्यासाठी प्रत्यक्ष साधना कशा प्रकारे करावयाची या संबंधीचे मार्गदर्शन आहे.

एकंदरीत हा ग्रंथ साधकाच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त असा आहे. साधकाच्या ठिकाणी साधनेपूर्वी कोणती पूर्वतयारी करावी लागते, योग्य चिंतन कसे करावे, तसेच ज्ञान व अज्ञान या गोष्टींचा योग्यायोग्यतेचा विचार करून साधकाच्या मनाची मशागत करण्यात आली आहे व सरतेशेवटी प्रत्यक्ष साधना कशी करावयची याबद्दलचे निश्चित स्वरूपाचे मार्गदर्शन आचार्यांनी केले आहे.

इतक्या सुलभ पद्धतीने या ग्रंथाची रचना केलेली आढळते. प्रत्येक भागाचा तपशील संक्षिप्तपणे समजावून घेतल्यास या आत्मानुभूतीची श्रेष्ठता मनात ठसेल. याच्या चिंतनाने व प्रत्यक्ष साधना करण्याने साधक आपले कल्याण करून घेऊ शकतो. हे नि:संशय!

या साधना ग्रंथाचे नाव अगदी यथार्थ आहे. अ- नाही, पर-दुसरे, अक्ष-डोळा, अनुभूति-अनुभव. म्हणजे स्वत:चा अनुभव स्वत:च घेणे. दुसऱ्याच्या अनुभवाने स्वत:च्या आत्म्याचा अनुभव कधीही प्राप्त व्हावयाचा नाही. म्हणून, स्वत:मधील आत्मतत्वाचा अनुभव स्वत:लाच प्रत्यक्ष येणार अनुभव होय.

आत्मतत्त्वाची प्रत्यक्ष अनुभूती हा विषय इतका सोपा नाही. त्यासाठी साधकाची पूर्वतयारी असणे अत्यंत आवश्यक आहे. आचार्यांनी शिष्यांना संदेश देताना म्हटले आह - ज्या विराट शक्तीच्या इच्छेनुसार या देहाने जन्म घेतला, आणि कार्य केले, तीच इच्छाशक्ती तुम्हा सर्वांना प्रेरणा देईल. वेदांताची आदर्श युक्त शिकवण - विशेषत: साधनेचा आदर्श सगळ्या जगाचे संपूर्ण कल्याण करणारा आहे.

ग्रंथाचा उद्देश स्पष्ट करताना आचार्य म्हणतात, 'आत्मानुभूति समाजावून सांगणे व त्यासाठीचे साधन विशद करणे हा या ग्रंथाचा उद्देश आहे.'

ग्रंथाची सुरुवात श्रीहरीच्या वंदनाने करण्यात आलेली आहे. मानवाने आपल्याला प्राप्त झालेल्या वर्ण व आश्रम पद्धतीने वागून ईश्वराला प्रसन्न करून घ्यावे. त्यातून वैराग्यादी गोष्टी प्राप्त होतील व पुढील वाटचाल सुलभ होईल. यासाठी वैराग्य, विवेक, शम, दम, उपरती, तितिक्षा, श्रद्धा, समाधान, मुमुक्षा या शब्दांमागील कल्पना मनात पक्की ठसणे अत्यावश्यक या साऱ्यांचे थोडक्यात विचार करू.

*वैराग्य* : स्थूलापासून अणूपर्यंत म्हणजे गवताच्या काडीपासून तो ब्रह्मापर्यंत सर्व सृष्ट पदार्थाबद्दल उदासीनता

असणे. भोगलालसा–आसक्त भोग विराग–अनासक्त या दोहोच्या पलीकडे असणारी मानसिकवृत्ती म्हणजे वैराग्य होय. (ब्रह्मादि स्थावरान्तेषु वैराग्यं) केवळ विषयापासून दूर राहण्याने हे साध्य होत नाही. मनानेच विषय नाकारले जातात, तेव्हा वैराग्य संभवते.

_विवेक_ : आत्मा हाच शाश्वत व एकमेवाद्वितीय, जग नाना गोष्टीने युक्त व सतत बदलणारे. यावर निश्चयात्मक निष्ठा म्हणजे विवेक होय. (नित्यं आत्म स्वरूपं हिय: निश्चय: विवेक:स:) आत्मा म्हणजे सत् चित् आनंद असणे, जाणणे–आनंदी. परंतु जग अशाश्वत, जड व चैतन्य यांनी युक्त. सुखदु:खमय म्हणजे आत्मतत्वाच्या उलट. आत्मा नित्य म्हणजे शाश्वत, जाणीवयुक्त म्हणजे स्व संवेद्य आणि सुखदु:खातीत अवस्था म्हणजे आनंदी हे ज्याला समजले त्याला विवेकी म्हणतात.

_शम व दम_ : सहज वासना त्याग हा शम, निग्रह पूर्वक इंद्रियांना विषयांपासून थोपविणे हा दम. (सदैव वासना त्याग: शम: बाह्यवृत्तीनां निग्रह: दम:) विषयाबद्दल मन:पूर्वक आवड वा ओढ नसणे अथवा निर्माण न होणे, याला शम म्हणतात. शम म्हणजे शांत भाव. निग्रहपूर्वक मनाला त्याच्या ओढाळ प्रवृत्तीपासून परावृत्त करावयास लावणे याला इंद्रिय दमन म्हणतात.

_उपरती व तितिक्षा_ : सर्व विषयवासनांपासून मन परावृत्त होते, याला उपरती म्हणतात. सर्व दु:खे सहन करण्याची पराकाष्ठा ही तितिक्षा. (विषयभ्य: परावृति: उपरती:। सहनं सर्व दु:खाना तितिक्षा)

शम व दम यांमुळे मन विषयांपासून परावृत्त झालेले असते. या अवस्थेला उपरती म्हणतात. या अवस्थेत वासनांनी मन अस्वस्थ होत नाही. अशा संयमित मानसिक अवस्थेला उपरति म्हणतात. दुर्दैवाने वाटेला आलेले दु:ख शांतपणे सहन करणे, अशी मनाची क्षमता असणे याला तितिक्षा म्हणतात.

आतापर्यंत वैराग्य, विवेक, शम, दम, उपरति आणि तितिक्षा या संबंधी विचार सांगितला. अध्यात्म क्षेत्रात या सर्वांचा फार मोठा उपयोग आहे. या गोष्टी अंगी बाणल्यावरच पुढील वाटचाल सुकर होते.

_श्रद्धा – समाधान_ : वेद, गुरू व शास्त्र बंधन यांवर नितांत प्रेम हीच श्रद्धा. यावरील मनाची एकाग्रता म्हणजेच समाधान. (निगमाचार्य वावयेषु भक्ति: श्रद्धा। चित्तैकाग्रयं समाधानं) वेद, आचार्य, शास्त्रे यांच्यावरील भक्तीने जाणीवपूर्वक अभ्यास करून ती आचरणात आणणे म्हणजे श्रद्धा होय. या वचनांचा विचार केन्द्रित होऊन चित्त एकाग्र होते या स्थितीला समाधान म्हणतात. मन शंका विरहित होणे यालाच समाधान म्हणतात.

_मुमुक्षा_ : संसार सागरातून पार होण्यासाठी भगवंताच्या ठिकाणी केलेली प्रार्थना. म्हणजे भगवंताला शरण जाणे. (संसार बंध निर्मुक्ति: कथं मे स्यात् इति या सुदृढा बुद्धि: सा मुमुक्षता!)

आतापर्यंत सांगितलेल्या उपायांनुसार आपले कल्याण व्हावे अशी इच्छा करणाऱ्या साधकाने आपल्याला ज्ञान प्राप्त व्हावे यासाठी प्रयत्न करावा. आत्मतत्त्वाच्या अनुभवार्थ नेटाने प्रयत्न चालू ठेवावेत. मन अन्यत्र विचलित होता कामा नये. उपनिषदे सांगतात – आत्मा एवजानथ। अन्या भाषा विमुंचथ। हा प्रयत्न जोरकस झाला पाहिजे. कारण ज्ञानावाचून कैवल्य नाही. (ज्ञानात् एव तू कैवल्यम्।)

प्रकाशाशिवाय वस्तुमात्राचा बोध होऊ शकत नाही. त्याप्रमाणे इतर मार्गांचा अवलंब केल्याशिवाय ज्ञानाचा उदय होत नाही. (पदार्थ भानं विना प्रकाशेत क्वचित् उत्पद्यते तथा अन्य साधनै: ज्ञानं उत्पद्यते) योग्य तऱ्हेने शोध घेतल्या खेरीज ज्ञानोदय होणे अशक्य. यासाठी विविध मार्ग हाताळले पाहिजेत. जेणे करून अज्ञानाची पुटे दूर होतील. त्यासाठी आत्मचिंतनाची

आवश्यकता आहे. जप, तपं, चिंतन, ध्यान ही ज्ञान साधने आहेत.

**चिंतनाचा प्रारंभ बिंदु :**

मी कोण आहे? हे जग कसे निर्माण झाले? याचा निर्माणकर्ता कोण? याचे उपादान कारण कोणते? अशा प्रकारे शोध घ्यावा (कोऽहं, कथं इदं जातं, कीवा कर्ताअस्य, उपादानं किं अस्ति, इत्यादि विचारा:) यालाच अन्वेषणा म्हणतात.

मी कोण? हा विचार कसा करावा– पंचमहाभूतापासून निर्माण झालेले गाठोडे म्हणजे मी नव्हे. पंचज्ञानेंद्रिये म्हणजे मी नव्हे (नाहं भूतगण: देह: नाहं अक्षगणा: विचार: सोऽयं ईदृश:।) याहून मी वेगळा आहे. (चिदानंद रूप: शिवोऽहं शिवोऽहम्।) शोध घेण्याच्या या प्रक्रियेला चिंतन असे म्हणतात.

अज्ञानामुळे न समजणाऱ्या गोष्टी ज्ञानाच्या उदयाने प्रकाशित होतात. तेव्हाच नि:संदेहपणे मी, म्हणजे ब्रह्म हा भाव रुजतो.

मनाच्या संकल्पामुळे विविधता निर्माण होते. (मनोमरं इदं जगत्।) माझ्यात आत्मज्ञानाचा उदय होताच हे संकल्प नाहीसे होतात. मन मानते तोवरच हे जग आहे. मन ज्यावेळी निद्रिस्त असते, त्यावेळी जग कोठे असते? मनात ठसल्याखेरीज जगाचे अस्तित्व कुठे आहे.

**अज्ञानाची अनेक उदाहरणे :**

आत्मा व शरीर या विषयी ज्या कल्पना आहेत त्या साऱ्या अज्ञानमूलक आहेत. मात्र व्यवहार करताना शरीरालाच 'मी' असे संबोधून मानव व्यवहार करतो. या विषयीचे अज्ञान त्याच्या ध्यानातही येत नाही. म्हणजेच, त्याचा सारा व्यवहार हा अनात्म स्वरूपाचा होत असतो. आत्मा व शरीर यांतील भेद समजून घ्यावेत. ती दोनही एक नव्हेत. याचा प्रत्यय घ्यावा. उदा.– आत्मा कला विरहित, निरवयव, शरीर अनेक अवयवांनी युक्त (आत्मा निष्कळ: एक: देह: बहुमि: आवृत: तयो: ऐक्यं अज्ञान परम्।)

आत्मा अंतर्यामी, नियामक – शरीर बाह्य नियमांनी नियंत्रित केले जाणारे. (आत्मा अन्त: नियामक: देह: बाहा: तयो: ऐवचं अज्ञानं)

आत्मा ज्ञानवान् पवित्र – शरीर मांस मय, अशुद्ध (आत्मा ज्ञानमय: देह: मांसमय:)

आत्मा प्रकाशवान् स्वचल – देह तामस (आत्मा प्रकाशक: स्वच्छ: देह: तामंस:)

आत्मा नित्य सत् रूप – देह अनित्य असत्रूप (आत्मानित्य: सत्रूप: देह: अनित्य: असत्मय:)

आत्मा प्रकाशक असल्याने सारे प्रकाशित होत असते; मात्र त्याचा प्रकाश अग्नी इत्यादीप्रमाणे मर्यादित नाही. भौतिक प्रकाश नसला की अंधार होतो मात्र आत्मतत्व नित्य प्रकाशित. (आत्मत: प्रकाशत्वं न अग्न्यादि दीप्तिवन्।) आत्मतत्वाचा प्रकाश म्हणजे जाणीव. ही जाणीव गाढ निद्रेतही जागी असते म्हणजेच प्रकाशित असते.

**ब्रह्मच नित्य व सत्रूप :**

जग अनित्य असत्रूप. विश्व व ब्रह्म यांचे वास्तविक एकत्वच आहे. अज्ञानाने वेगळेपणाने व्यवहार केला जातो. सोने व अलंकार एकच. तद्वत् विश्व ब्रह्म एकच: विविधता मनोमय. सारे लोकव्यवहार अज्ञानाने देहभावनेने करतात. देहाला आत्मा मानणे अयोग्य. मशाल वर्तुळाकार वेगाने फिरवताच वर्तुळाकार तेजोवल्य असल्याचे भासते; तसा आत्मतत्त्वात देहत्वाचा भास होतो. अग्नीला रत्न मानले जाते व रत्नाला अग्नी मानले जाते, ही भ्रामक कल्पना. तद्वत् आत्म्याला देह मानणे अज्ञानमूलक होय.

म्हणून, हे मानवा निरंतर आपल्या स्वरूपाचे चिंतन कर. आत्मज्ञानानंतर प्रारब्ध कर्मफल संभवत नाही.

आत्मज्ञानाने प्रपंचाची निवृत्ती होते. (क्षयिन्ते चास्य कर्माणि नस्मिन् दृष्टे परावरे) प्रपंच याचा अर्थ – प्रकर्षेण पंच, पाच गोष्टी ठळकपणे आढळतात. पांच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेन्द्रिये, पंचमहाभूते, पंचप्राण, पांच विषय (तन्मात्रा) पंचवृत्ती (प्रमाण, वितर्क, विकल्प, निद्रा व स्मृति) हे सारे अज्ञानाचे कार्य.

**आध्यात्मिक योग साधना :**

मुक्तीसाठी सदैव ध्यानात मग्न राहाता येईल अशा उपयुक्त पंधरा गोष्टी साधकासाठी म्हणून सांगितल्या गेल्या आहेत. यांचा नित्य अभ्यास करणे सच्चिदानंद आत्मतत्वाच्या प्राप्तीसाठी नितांत आवश्यक आहे. स्व हिताच्या दृष्टीने साधकाने ब्रह्माचे नित्य ध्यान करावे. (नित्याभ्यांसात् ऋते प्राप्तिः सच्चिदात्मनः न भवेत्।) आध्यात्मिक योगाची पंधरा अंगे येणे प्रमाणे – यम, नियम, त्याग, मौन, देश, काल, आसन, मूलबंध, देह साम्य, दृष्टिसाम्य, प्राण संयमन, प्रत्याहार धारणा, ध्यान, समाधि. हठयोग हा अष्टांग आहे. मात्र आचार्यांनी सांगितलेला योग मार्ग पंधरा अंगांचा आहे. अष्टांगापेक्षा या अंगांचा विचारही विशेष प्रकरे केलेल आहे. आता क्रमवार त्यांचा विचार करू.

*यम* – सर्व ब्रह्ममय आहे. (सर्व खलुइदं ब्रह्म) हा अनुभव प्रत्यक्ष ज्ञानेंद्रियावर जो संयम ठेवावयाचा असतो त्याला यम म्हटले आहे. याचा वारंवार अभ्यास करावा. (अभ्यासनीयः मुहुः मुहुः)

*नियम* – सजातीय प्रत्यय (विचार) प्रवाह ठेवणे आणि विजातीय प्रत्ययाचा त्याग. हा परमानंद देणारा नियम. (सजातीय प्रवाहः विजातीय तिरस्कृतिः नियमः परमानन्दः।)

*त्याग* – चिदात्म्याच्या रूपात प्रपंचरूप जाणताच त्याचा आपोआप त्याग होऊन जातो. महात्म्यांना हा त्याग पूजनीय कारण तात्काळ मोक्षप्राप्ती. (प्रपंचस्य चिदात्मत्वात् अवलोकनात त्यागः महतां पूज्यः।)

*मौन* – वाणीसह मन ज्यास प्राप्त न करता परत येते, ते मौन. हे योगी जनाना प्राप्त होते.

*देश* – आदि मध्य अंती देखील ज्याच्यात विश्व असत नाही. पण ज्याने हे सारे व्यापून टाकले आहे. अशा त्याच्या अवस्थेला देश म्हणतात. ही एकाकी स्थिती म्हणजे ब्रह्मस्थिती होय. (आदौ अन्तं मध्येच यस्किन् जनः न विदाते येम इदं सततव्याप्तं स देश निजनः स्मृतः।)

*काळ* – कलनान् सर्व भूतानाम्। काळ संज्ञेने एक अद्वय अखंड परमानन्दाची स्थिती. हीच ब्रह्म स्थिती. ही स्थिती सर्वत्र विलसत राहाते. (काळ शब्दे निर्दिष्ट अखंडानंद अद्वयः।)

*आसन* – सुखाने ब्रह्म चिंतन, होईल त्या स्थितीला आसन म्हणतात. (सुखेनैव भवेत् यस्मिन् ब्रह्मचिन्तनम्।)

*सिद्धासन* – जे सर्व प्राणिमात्राचे उत्पत्तिस्थान समजले जाते ते सर्व घडामोडीचे स्थिर अधिष्ठान. सिद्ध पुरूष यात समाविष्ट होतात. (सिद्धं यत् सर्व भूतादि अधिष्ठान यस्मिन् सिद्धः समाविष्टाः तत् सिद्धासनम्।)

*मूलबंध* – सर्व भूतमात्रांचे जे मूळ स्त्रोत व ज्यात चित्त स्थिर होते त्याला मूलबंध म्हणतात. राजयोगी याचा अभ्यास करतात. (यत् मूलं सर्वभूतानां चिन्तबंधनं मूलबंधः।)

*देहसाम्य* – ब्रह्मात लीन होणे. केवळ काठी सारखे शरीर ताठ ठेवणे ही समता नव्हे. (अंगानां समता विद्यात् समे ब्रह्मणि लीयते। शुष्क वृक्षवत् न समानत्वं।)

*दृक् स्थिति* – दृष्टी ज्ञानमय करून जगाला ब्रह्म स्वरूपात पाहावे. नासाग्रावलोकिनी दृष्टी परमोदारा नाही. द्रष्टा, दर्शन, दृश्य हे तीनही एकवटतात व विराम पावतात. तिथे दृष्टी ठेवावयास हवी. (दृष्टी ज्ञानमयी कृत्वा, जयं जगत् ब्रह्म इति पश्येत्। सदृष्टीन नासाग्रावलोकिनी।)

*प्राणायाम* – चित्तादि सर्व वृत्तीत ब्रह्मच आहे. अशा भावनेने सर्व वृत्तींचा विरोध करणे, हाच प्राण संयम. (चित्तादि सर्व भावेषु ब्रह्मत्वेनैव भावनात् सर्व वृत्तीनां विरोध: प्राणायाम:।) रेचक – प्रपंचाचा निषेध करणे. (निषेधनं प्रपंचस्य रंचकारव्य:) पूरक – मी ब्रह्म आहे ही वृत्ती पूरक (ब्रह्मैव अस्मि या वृत्ति: पूरक:।) कुंभक – वृत्तीला स्थिर ठेवणे (तत् वृत्ति नैश्चलयं कुंभक:।) ज्ञानी लोकांचा हा खरा प्राणायम होय. (अर्य प्रबुद्धानां) अज्ञानी लोक केवळ नाकाला पीडा देत राहातात. (अणि तु अज्ञाना पाण पीडनम्।)

*प्रत्याहार* – विषय आत्मस्वरूपच आहेत असे पाहून मनाला त्या चिदात्म्यात बुडवून टाकणे. मुमुक्षूनी याचा दक्षतेने अभ्यास करावा. (विषयेषु आत्मतां दृष्ट्वामनस: चिति मज्जनं प्रत्याहारं: विज्ञेय:। अभ्यसनीय: मुमुक्षुभि:।)

*धारणा* – जेथे मन धावते तेथे ब्रह्मच आहे असे पाहून मन स्थिर करणे. (यत्र यत्र मनी यानि ब्रह्मन तत्र दर्शनं। मनस: धारणं धारणा परा मता।)

*ध्यान* – मी ब्रह्म आहे या वृत्तीत आधाररहित स्थिती होते, तेच ध्यान. (ब्रह्मैव अस्मि सद्वृत्त्या निरालंबतया स्थिती: ध्यान इति व्याख्यात: परमानंद दायिनी।) ही स्थिती परम आनंदाची.

*समाधी* – वृत्ती निर्विकार होऊन ब्रह्माकार होऊन जाणे. वृत्तीचे संपूर्ण विस्मरण होणे ही समाधी. ही ज्ञान समाधी. (निर्विकार तया कृव्या ब्रह्माकारतया पुन: वृत्ति: विस्मरणं समाधि: ज्ञान संज्ञक:।) जो पर्यंत स्वरूपाकार ब्रह्माकार वृत्ती उदित होत नाही तोपर्यंत अकृत्रिम आनंदाचा अभ्यास साधकाने करावयास हवा. (एवं आकृति समभ्यसेत् क्षणात् पुंस: प्रयुक्त: संभवेत्।)

साधनेत काही वेळा विघ्ने येतात. उदा. मन भरकटते, आळस, भोगलालसा, निद्रा, मंदपणा विक्षेप, रसास्वाद आणि शून्यता. त्याचा लक्षपूर्वक निरास करावा. (समाधौ क्रियमत्रि विघ्ना: आयान्ति; त्याज्यं ब्रह्मविदा शनै:।)

जो भाव वृत्तीचा तशी वृत्ती आकारते. ब्रह्म असेल तर ब्रह्मवृत्ती शून्य असेल तर शून्यवृत्ती म्हणून ब्रह्माचे चिंतन नित्य करावे. (भाववृत्त्या भावत्वं शून्यवृत्त्या शून्यत्वं पूर्णवृत्त्या पूर्णत्वं)

जे लोक ब्रह्मवृत्तीचा त्याग करतात ते या पृथ्वीवर पशू प्रमाणे व्यर्थ जीवन जगतात. (ब्रह्माख्यां पावनी परावृत्ती ये जहाति वृथैव ते जीवन्ति।)

ते साधक धन्य होत, जे ब्रह्मकार वृत्तीला जाणतात व जाणून वृत्ती वृद्धिगंत करतात ते. सत् पुरुष धन्य होत. (येषां वृत्ति: समावृद्धां सा परिपक्वा ते ब्रह्मणां प्राप्ता न इतरे शब्द वादिन:।) जे केवळ शब्दज्ञानी वेदाचार्य असतात, त्यांनाही स्थिती प्राप्त होत नाही.

अशी माणसे ब्रह्माबद्दल फुकट बडबड करण्यात कुशल असतात. ही अज्ञानी माणसे पुन: पुन:: जन्म मरणाच्या फेऱ्या करत राहतात. (ब्रह्म वार्तायां कुशला वृत्तिहीना: अंज्ञान्तिमा: नूर्त पुनर् यान्ति अयान्ति।)

खरे मुमुक्षु सनक, शुक आदीप्रमाणे सतत ब्रह्मवृत्तीत राहतात. ब्रह्ममय वृत्तीशिवाय एकक्षणभर सुद्धा राहत नाहीत. (ब्रह्ममयी वृत्ति विना निमेषार्ध न तिष्ठन्ति यथा सनकाद्या: शुकादय:।)

अशा अंशांनी युक्त राजयोग सांगितला आहे. ज्यांची मुळे शुद्ध झालेली आहेत जे सद्गुरु व इष्ट देवतेचे भक्त आहेत त्यांना हे सुलभ व शीघ्र प्राप्त करून देणारा हा योग आहे.

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड, वंदना बस स्थानकाजवळ, ठाणे – ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*आपली ओळख आयकर क्रमांक, जात दाखल्यातील जात वगैरे पुरती मर्यादित नसून 'मानवी' ओळख त्या पलीकडे आहे. या संबंधातील हे विचार – संपादक*

**प्रास्ताविक :**

दिशाच्या मागील दोन अंकात आपण भारतीय संस्कृतीत व्यक्तीची ओळख व नोंद कशी व का घेतली जाते ह्यावर विचार केला.

एक गोष्ट उघड आहे की, आज आपल्या पूर्वीच्या सत्ताधीश परकीयांनी नामांकित केलेल्या, 'इंडिया' या देशात, व्यक्तीची ओळख ही त्याचा जन्म, मृत्यू व त्याचे शिक्षण, इनकम टॅक्स नंबर (Pan card), इलेक्शन कार्ड नंबर, फोटो, पासपोर्ट वगैरे पद्धतीने ठेवली जाते. आता ही सर्व इलेक्ट्रॉनिक कार्डावर घेण्याचा ''महत्वकांक्षी'' प्रयोग सुरू होणार आहे. ह्या व्यक्तीच्या ओळखीत आता त्याची 'जात' (मागासलेले, ओ.बी.सी, ट्रायबल, वनवासी वगैरे) धर्म (हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन वगैरे) ह्यांची पण काळजीपूर्वक नोंद घेतली जाणार आहे.

हे सर्व ह्या व्यक्तीच्या उदरनिर्वाह, परदेशगमन, 'इलेक्शनमार्गे 'राज्यकर्ते' निवडण्याच्या अधिकार' व धान्य पुरवठा घेण्याचे हक्क (Ration card) यांवर आधारलेले असणार.

एवढेच नव्हे तर ती व्यक्ती जर भारतात रस्त्यावर मोटरकार, स्कूटर, मोटरबाईक वगैरे वाहनाने प्रवास करणार असेल तर, त्या व्यक्तीला ठिकठिकाणी ''टोल'' नावाचा टॅक्स त्या त्या संबधित स्थानिक (लोकल) संस्थांना वा रस्ता, पूल बांधणाऱ्या कंपन्याना द्यावा लागेल. त्याशिवाय त्याला त्या रस्त्याचा, वाटेचा वापर करता येणार नाही. त्याकरिता सुद्धा व्यक्ती व्यक्ती मधील अधिकार निरनिराळे असू शकतील. (Discrimination in Individned rights) शिक्षण घेण्याकरिता – म्हणजे, जीवन जगण्यासाठी, (जे 'आवश्यक शिक्षण' ठरविलेले असेल) ते शिक्षण घेण्यासाठी – जी काही 'वर्गवारी', राज्यसंस्थेने ठरविली असेल, त्याची नोंदही ठेवली जाईल. कुठल्याही व्यक्तीच्या सामाजिक वा नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर करण्याचा अधिकार त्यामार्गे हा या मानवनिर्मीत राज्यसंस्था नियंत्रित करतील.

हे सर्व वर्णन अशासाठी करतो आहे, की भारतात जन्म घेतल्यावर 'त्या जीवात्म्याला' ह्या गुंतागुंतीच्या नियमांच्या अंमलाखाली यावेच लागते. याची पूर्व जाणीव त्याला नसेलही. कारण, ह्या भारत देशातल्या समाजाने निडलेल्या 'समष्टि'चे नागरिकत्व (जे जन्मतःच बहाल केले जाते) त्या कठोर नियमांचे पालन अर्थातच आवश्यक आहे!! तरच, त्याचे भौतिक जीवन सुरळीतपणे चालेल असे बजावण्यात येते!! ह्या करिता वर्तमानपत्रे, टी.व्ही. वगैरे वरून त्याला त्याच्या जन्म, मृत्यूची नोंद ठेवण्याची 'नोटीस' वारंवार दिली जाते. केवढी गुंतागुंतीची ही यंत्रणा – नाही का? पण, ती 'न्याय्य' आहे का? ती परिपूर्ण आहे का? मानवाच्या सर्वांगीण आशा आकांक्षांची काळजी घेते का?

प्रश्न हा विचारला जाईल की भौतिक जीवन जगण्याकरिता समाजमान्य असे जे नियम, कायदे आहेत ते पाळावेच लागतात. व्यक्तीचे अधिकार व स्वातंत्र्य भारतीय राज्यघटनेने ठरविले जातात.

पण, निसर्गाच्या नियमांतले जे सातत्य, नेमकेपणा,

नैतिकता, न्याय व वैश्विक जीवनाच्या उद्दिष्टांची तरतूद. इथे ह्या राज्यसंस्था करतात का?

पण, जी यंत्रणा आज अस्तित्वात आहे, ती काही एकदम आली नाही, तर सामाजिक इतिहासात जे वैचारिक सांस्कृतिक प्रवाह आले, त्यांचा परिपाक या नीतिनियमांच्या बांधणीला कारणीभूत झाला व समाजाच्या 'त्या क्षणी', ज्या जीवाचा ह्या समाजात जन्म झाला, त्याला जन्मपरत्वे हा नीतिनियमांचा, 'आयडेंटिटीचा' (Identity) व्यवहार मान्य करण्यापासून सुटका नाही. मुक्तता नाही. एवढेंच नव्हे तर त्याच्या बाल्याअवस्थेतच त्याच्यावर प्रचलित शिक्षणसंस्था व सरकार दप्तरे व त्याचे कुटुंबही, हे विचार लादत असतात व त्याचे नकळत रेजिमेंटेशन (Regimentation) होत जाते. याच गोष्टी त्याच्या विवेकाच्या तर्कशास्त्राला स्वत:चे रंग लावत जातात. हे सर्व त्याच्या संमतीने होतेच असे नाही. उलट, ज्या निसर्गाने त्याला अन्न, पाणी, हवा, सूर्य, चंद्र वगैरे ह्यांची उपलब्धी फुकट दिलेली आहे. त्याचा ताबा घेऊन व त्यावर राजसत्तेचा अधिकार मिळवून, या प्रत्येक नवीन जीवात्म्याला ह्या व्यवस्थेचा गुलाम करण्यात येते. हे आत्मस्वातंत्र्य नव्हे! स्वराज्य पण नव्हे!!

जगातील प्रत्येक देश ह्या व्यवस्थेला पर्याय नाही असे मानत आला आहे.

पण, हे अर्धसत्य आहे!! निदान भारतीय संस्कृतीवर अन्याय करणारे आहे. ह्या संस्कृतीची पूर्ण जाण नसणारे आहे!! कारण मानव हा Social Animal, '<u>सामाजिक प्राणी</u>' आहे असे हे जग मानताना दिसते. ते पूर्ण खरे नाही.

भारतातले ऋषिमुनी, पंडित, तत्ववेत्ते, संत, विचारवंत भारतीय 'आध्यात्मिक संपदेच्या सत्य ज्ञानाच्या वारसा' हक्काने पावन झाले असल्याने, ते प्रत्येक जीवाला 'जीवात्मा', म्हणजे 'Individual Soul' असे मानतात. त्याला 'Spiritual Man' '<u>आध्यात्मिक जीवात्मा</u>' मानतात. (Being and becoming) त्याचा विस्तारित अर्थ म्हणजे ह्या पृथ्वीवरील भारत या भूभागावरचा त्याचा जीवन प्रवास हा त्याच्या खऱ्या वैयक्तिकतेचा म्हणजे '<u>आत्म्याचा उद्धार</u>' होण्यासाठी व्यतीत होत असतो. त्याची ह्या पृथ्वीवर 'भूमीवर' आई, बाप (पिता) यांचीही निवड झालेली असते. त्याच्या आत्मिक उद्धाराचा मार्ग आंखलेला असतो.

**स्वराज्य का स्वातंत्र्य? :**

**लोकमान्य टिळक ''<u>स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे</u>'' असे ब्रिटीश राजसत्तेला सांगत असताना, त्यांच्यापुढे '<u>गीतारहस्याचा</u>' अर्थ होता, असे खात्रीपूर्वख वाटते. ''स्वराज्याचा अर्थ'' केवळ '<u>राजकीय स्वातंत्र्य</u>' हा नव्हता. तर '<u>जन्मसिद्ध आत्मिक हक्काचे राज्य</u>' असा होता.**



ज्या काँग्रेसचे ते अध्यक्ष होते, त्यांना हा गूढ, खोल अर्थ समजला नाही व त्यांनी ही राज्यघटना निधर्मी व सेक्युलर करून टाकली आणि 'धर्माची' पूर्ण उचलबांगडी करून, भारतीय संस्कृतीचे पद्धतशीर उच्चाटन करून, पाश्चात्य भौतिक संस्कृतीला हा समाज बांधून टाकला. शिक्षणसंस्था, आर्थिक संस्था, न्याय-संस्था सुद्धा ह्या विचारांना पूर्णपणे बांधून टाकल्या आहेत.

ज्ञानी पुरुष बाहेरील प्रकाशावर अवलंबून नसतात.

'ग्लोबलायझेशनचा' विचार व मार्ग हा नक्कीच भाविष्य निदर्शक आहे. आपला देश व आपले स्वार्थ ह्यांच्या 'कक्षा जागतिक, **(वैश्विक नव्हे)** करण्याची ही दिशा आहे. पण हा विचार तर हिंदु समाजाने केव्हाच केला आहे. भारतीय संस्कृतीचे बीज वेदिक अपौरूषेय ज्ञान व विद्यांवर आधारलेले आहे.!!

केवळ, एक महत्वाचे उदाहरण म्हणून स्वा.वीर सावरकर यांच्या 'अखिल हिंदू ध्वज' ह्या लहानश्या विस्मृतीत गेलेल्या पुस्तिकेतील उतारे देतो. भूमिका अत्यंत स्पष्ट आहे.



''प्रत्येक ध्येयास, प्रत्येक समाष्टिस, प्रत्येक नवीन महाकार्यास त्याचे रहस्य व्यक्त करणारे आणि त्याच्या स्फूर्तीने अंत:करणास उद्दीत्त करणारे असे जे त्याचे विशिष्ट संस्कार आणि जी स्वतंत्र प्रतीके असावी लागतात, त्या सर्वांमध्ये त्या ध्येयाचा, समष्टिचा किंवा महान विचाराचा द्योतक आणि प्रवर्तक जो त्याचा ध्वज तोच त्याचे प्रबळतम प्रतिक असतो.

**एक देव, एक राष्ट्र नि एक संस्कृति, एक रक्त, एक बीज एक भूतकाळ आणि एक भवितव्य या अखंडनीय संबंधानी संबद्ध झालेल्या, ह्या एक गटातील चाळीस कोटी हिंदु जातीच्या महान समष्टिचा आणि तिच्या संघटनाच्या महत्कार्याचा हेतू आणि संदेश, बळ आणि तेज, अखिल मुनष्य जातीस व्यक्त करणारे प्रतिक म्हणजेच हा आमचा हिंदु जातीचा, अभिनव हिंदुध्वज होय.**




पण, हा ध्वज हिंदु जातीचे तेवढे प्रतीक नसून हिंदु धर्माचेहि प्रतीक असल्याने, तो त्या धर्माच्या सर्वांगीण उदारतेइतकाच विस्तृत आहे. हिंदु धर्माच्या ध्येयाप्रमाणेच तो हि 'स भूमि विश्वतो कृत्वा अत्यतिष्ठत दशांगुलम्!' हिंदुच नव्हे तर उभी मानवजात नास्तिका-पासून अस्तिकापर्यंत, हाटेंटाटपासून हिंदूपर्यंत वर्ण-जाति-पंथ-निर्विशेष त्याच्या अमृतोपम शीतल छायेखाली समाविष्ट होऊन 'श्रेय परम्' प्राप्त करू शकेल इतका तो विस्तृत आणि भव्य, उदात्त, उच्च आणि दिव्य आहे.

कारण, लोकांची धारणा करतो तो धर्म. 'धारणात धर्मामित्याहु धर्मो धारयति प्रज्ञा!' त्या धर्माची साध्ये दोन; ''अभ्यूदय'' आणि ''निश्रेयस्' ऐहिक भक्ती, पारलौकिक नि:श्रेयसाचे, अतींद्रिय आनंदाचे, पारमार्थिक परम गंतव्याचे जे द्योतक या ध्वजावर अंकित केलेले आहे, ते म्हणजेच **'कुंडलिनी'** हे होय.

ती ज्ञानयोगाची कुंडलिनी, हे कर्मयोगाचे कृपाण!

दुसऱ्याने सांगितलेल्या शब्दांवर विश्वास ठेवून संशय निवृत्ती होत नाही.

परिनाणाय साधुनां, विनाशाय दुष्कृताम्। इशावास्यं इदं सर्व यत्किंच जगत्या जगत् तेन त्यक्तेन भुजीना।

हाच आमच्या हिंदुध्वजाचा जागतिक संदेश आणि **जातीय घोषणा**, ही कुंडलिनी आणि कृपाण करीत आहे. (इथे 'जात' ह्याचा अर्थ दैशिक शास्त्रावर आधारून - एका आत्मध्येयाने जन्मलेले असा आहे)

ह्या कृपाणाने ह्या शक्तीने प्राप्त होणारे राज्य, सामर्थ्य, अधम आततायी लोकांच्या कलंकाने दूषित होऊ नये म्हणून

'तेन व्यक्तेन भूंजीथा मागृध कस्यचित धनं' हे नीतिमत्तेचे सार सूत्र सदोदित सन्मूख असावे यास्तव या कृपाणाचा ह्या हिंदुध्वजाच्या पृष्ठभूमिचा रंग.

''भगव्यावर ॐकारयुक्त कुंडलिनी आणि कृपाण अंकित आहे. त्या ह्या हिंदुजातीच्या हिंदुध्वजाचा संकेतार्थ. हा गूढार्थ आहे, हे तात्विक रहस्य आहे!!

ह्या लेखाचा काळ स्वातंत्र्यप्राप्तीच्या अगोदरच्या काळाचा आहे. राष्ट्र ह्या कल्पनेची संकल्पना, आखणी ध्येय व तत्वे मांडण्याची ही वेळ होती.

ह्या लेखातील संदर्भ हे आध्यात्मिक व भौतिक समन्वयी ध्येयांचे आहेत! 'Integral Social' आहेत!! तसेच, त्यांतील आदर्श ऋग्वेद, पुरुषसुक्त, कठोपनिषद व इतर उपनिषदे, विशेषत: 'इशावास्य' उपनिषदांतील आहेत. भगवद् गीतेतील आहेत. ज्ञानेश्वर, रामदास समर्थ ह्याच्या विचारावर आहेत!! त्या काळात ह्या तत्वज्ञानांची, योगमार्गाची, कुंडलिनी योगसाधनेची, ज्ञानेश्वर, रामदास समर्थ वगैरेंच्या प्रत्यक्ष साधनेची व विचार धारेची ओळख, आदर व जाण समाजाला होती. आज जी सर्वांशाने पुसून टाकली गेली आहे. अध्यात्म व समाज कल्याण या दोन्ही उपक्रमातून!!

हा मेकॉलेच्या कुटील नीतिचा विजय आहे आणि कॉंग्रेससारख्या व तत्सम राजकीय पक्षांच्या सतत पुष्कळ काळ सत्तेवर रहाणाऱ्या त्या त्या गटांचा वा पक्षांचा सामूहिक पराभव आहे द्रोह आहे किंवा अकर्तृत्व आहे!! एकांगी भौतिकवाद व चंगळवाद आणि भौतिक विज्ञानवादाचा विजय आहे!! हे नक्कीच!!

म्हणूनच आपण ज्या तिरंग्याचा राष्ट्रध्वज म्हणून निवड केली, त्यातील प्रतीके व संकेत किती भारतीय संस्कृतीशी बरोबर होते हा विचार सुचणे नैसर्गिक व उद्‌बोधक ठरावे!!

हे सर्व मी का लिहितो आहे? कारण, समाजात बदल करण्याचा शुद्ध हेतू जरी आपण तात्पुरता ह्या भौतिकवादी राजकीय, सामाजिक पक्षांना व त्याचा आधार असलेल्या भौतिक विज्ञानवादांना दिला, तरी त्यातील फरक व बदल हा व्यक्तीच्या (Individual) स्वभाव, प्रकृती बदलापासून सुरूवात होतो. समाजातील अत्यंत मूलगामी बदल हे एखाद्या ज्ञानी प्रभावी व्यक्तीच्या विचारांतून व कार्यातून झाल्याचे मानवी इतिहास दर्शवितो.

मग, ह्या संस्कृतीकरणामध्ये ज्या व्यक्ती कारणीभूत झाल्या त्यांच्या व्यक्तीमत्त्वाचा, शिक्षणाचा, वृत्तींचा, जडण-घडणीचा त्यांच्यावरील संस्काराचा, त्याच्या जन्मकुळीचा अभ्यास केला तर असे लक्षात येते की त्यांची बीजे जशी त्यांच्या कुळात, वंशात, वर्णात, शिक्षणावर आहेत तसेच त्याच्या 'विभूतिवादी' संप्रदायावरही आहेत. इथे 'विभूतिवाद' ह्याचा अर्थ कुठल्यातरी अगम, पारलौकिक तत्वांवर, आध्यात्मिक प्रेरणांवर आधारभूत शक्तीच्या साक्षात्कारावर आहे, प्रकटीकरणावर आहे!!

मग, ह्या Individual व्यक्तीच्या महत्त्वाचे कारण काय? जगातल्या संकटांची आजकाल परमावधी

गाठल्याचे आपल्या लक्षात आले तरी त्याच्यावर उपाय सापडत नाहीत. हे सर्व उपाय, योजना, उतारे उथळ, दर्शनी, फसवे अथवा कुचकामाचे आहेत.

सध्याच्या सामाजिक व राजकीय ज्ञानाच्या व समाजशास्त्र व राजकीय शास्त्र (Political & Social Sciences) ह्यांच्या वर आधारलेल्या सगळ्या योजनांचा गोंधळ व सतत पराभव दिसत आहे. मग ह्यांची सुधारण्याची मुहूर्तमेढ कधी व कुठून होण्याची शक्यता असू शकते? महायोगी अरविंद म्हणतात –

"The answer might, indeed be only 'individual"

The fundamental reason for this - the individual is indeed the key of the evolutionary movement, for it is the individual, who finds himself, <u>who becomes conscious of the reality.</u>

The movement of the collecfivity is a largely subconscious mass movement, it has to formulate and express itself through the individuals to become conscious : its general mass consciousness is always less evolved than the consciousness of its most developed individuals, and it progresses in so far as it accepts their impress or develops what they develop."

यातील महत्वाचे विधान आहे – <u>"individual, who becomes conscious of the reality."</u> सत्य व वास्तव ह्याची जाणीव होणे व ती व्यक्ती, व्यक्तीमध्ये होणे आवश्यक आहे. ह्या सत्यजाणीवेच्या पायावरच खऱ्या दोषांचे दर्शन – केवळ बहिर्गत नव्हे तर अंतर्गत दोषांचे दर्शन व ते सुधारण्याची इच्छा, प्रवृत्ती व उपक्रम – साधना होते. ही सुरुवात होते तेव्हा समाज सुधारतो.

पण, सत्य जाणीव म्हणजे काय? आतापर्यंत अनेक गुन्हे, हिंसा, अफरातफर, देशद्रोह, मानवद्रोह, निसर्गद्रोह, निसर्गविरोधी वर्तनाचे भयानक प्रकार समाजाच्या नजरेस आले. त्यांचे उच्च स्तरावर केलेले संशोधन व रिपोर्ट हे एकत्र केले, तरी त्यांचे सुपरिणाम का दिसत नाहीत? त्या कमिट्या, ते जॉईंट पार्लमेंटरी कमिट्यांचे रिपोर्ट, ती ऑडिट रिपोर्टची प्रकरणे, ते सर्वोच्च न्यायालयाचे ताशेरे, ते C.B.I. चे रिपोर्ट, त्या करप्शन विरोधी समित्या, ह्या सगळ्यांच्या भाराभार कागदी शिफारशी अंमलात येऊन समाज सुधारत आहे. समाजाचा नैतिक मूल्यांक उंचावत आहे, समाजात मानवी उत्क्रांतीची सर्वगुणी पाऊले पडत आहेत, असे दृश्य का दिसत नाही?

त्याचे कारण 'सत्याची' व्याख्या चुकीची आहे. Reality has not been properly defined. सत्याचा जाणून बुजून विपर्यास करण्यात येतो आहे. दुर्लक्ष करण्यात येतो आहे. **दिव्याखाली अंध:कार**, बोले तैसा चाले, असा साधु दिसत नाही कारण मनाला शुद्ध करणारा दासबोध फेकून दिला आहे!! मनातील शुद्ध प्रेरणांचा आवाज अंतरंगातच जाळून टाकण्यात येतो आहे. अशी चुकीची शिकवणूक देणारी जीवनपद्धती राज्यकर्त्यांनी, शिक्षणशास्त्रांनी, न्याय संस्थांनी, कायदा अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी शिरावर घेतली आहे. एवढेच नव्हे तर ह्या आसूरी धोरणाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आहे!!

असे का होते आहे? हा व्यक्तिगत बहिर्गत व अंतर्गत स्वभावातील समन्वय व शुद्धज्ञान का घडत नाही आहे?

त्याचे कारण एकमेव कारण म्हणजे ह्या मर्त्य समाजाने युगायुगाच्या वाटचालीत दीपगृहाप्रमाणे प्रकाश देणाऱ्या ध्येयाकडे पूर्ण दुर्लक्ष केले आहे.

असतो मा सत् गमय।
तमसो मा ज्योतिर्गमय।
मृत्योर्मा अमृतम् गमय।।

असत्याकडून सत्याकडे, अज्ञानाकडून ज्ञानाकडे, आणि मृत्यूतत्वाकडून अमृततत्वाकडे वाटचाल करा असा हा वेदिक, उपनिषदिक दीपगृहातील प्रकाश सांगतो आहे.

पण, भारताची नांव लक्षात घ्या-वेदामध्येही मानवी दैहिक अस्तित्वाला दिव्य नावेचीच उपमा दिली आहे- तिचा हा जीवन सागरातील प्रवास युगेन् युगे जन्मजन्मांतरी ह्या प्रकाश क्षेत्रात नेण्याची दिशा हा ज्ञान प्रकाश झोत दाखवितो आहे.

पण, ऐहिकवादी, भोगवादी, चंगळवादी राज्यकर्ते, समाजशास्त्रज्ञ व भौतिक विज्ञानवादी हे ह्या नावेला ह्या सागरातील 'बर्मूडा ट्रँगल' च्या गहऱ्या खोलीतील तळाकडे नेत आहेत. जी असणार आहे पूर्णकाळाची जलसमाधी!!

ही परिस्थिती सुधारण्यासाठी, एक सतत, जागृत यंत्रणा ह्या पृथ्वीतलावर ह्या दीपगृहाच्या तेजस्वी प्रकाशात राबवली जावी अशी सामाजिक संस्था हिंदु समाजात काल परवापर्यंत पुसटपणे का म्हणता पण जिवंत होती. आज ती पूर्ण विस्मृतीत गेली आहे.

१६ संस्कार, गर्भसंस्कार, उपनयन, विवाह संस्कार अंत्येष्टि वगैरे. पण त्यांचे ध्येयवादी व व्यवहारी पुनरुज्जीवन व शास्त्रीय पायावर व्हावयाला हवे. त्यांतील अग्नितत्व त्याची मंत्रशास्त्राने आवाहन, प्रज्वलनक्रिया व त्यानंतर आत्मयज्ञाच्या द्वारे परिवर्तनाची क्रिया ही मूळ वेदिक बीजावर पुन्हा उभी करणे आवश्यक आहे.

समाजातील ह्या यंत्रणेच्या ऐतिहासिक विस्मृतीमुळे त्या यंत्रणेचा आवाका, आशय व वैश्विक विज्ञान क्रियांचा परिचय पुन्हा नव्याने करण्याची आवश्यकता आहे! ह्या यंत्रणेला आवश्यक असणाऱ्या सामाजिक यंत्रणा पुन्हा उभ्या करून कार्यरत करण्याची आवश्यकता आहे.

दिशाच्या गेल्या ६ वर्षाच्या माझ्या लेखांतून ही भूमिका मी सातत्याने व माझ्या कुवतीप्रमाणे मांडत आलो आहे.

या लेखाचा विषय हा 'Individual' व्यक्तीच्या 'जागृत स्वरूपाचा' आहे. हे स्वरूप मर्त्य देह, ऐहिक शरीर, राजकीय मतदार, भौतिक शिक्षणाला बांधलेला विद्यार्थी, स्त्री-पुरुष संभोगाला लालचावलेला भोगी, मॉल, हाय राईज बिल्डिंग मध्ये सुख शोधणारा World citizen, वगैरे वगैरे असे स्वरूप ('सत्य स्वरूप') नव्हे. कारण, हे केवळ ह्या जन्मापुरते व ह्या प्रचलित राज्यव्यवस्थेतील सामावणारे स्वरूप उघडच मर्त्य स्वरूप आहे.

या पुरुषाचे स्वरूप अमृतपुत्राचे आहे. त्याची निर्मिती या विश्वातील अव्यक्त जगातून ह्या व्यक्त जगात हेतुपुरस्सर झाली आहे. त्या व्यक्तीच्या Embodied consciousness म्हणजे शरीरांतर्गत जीवन चैतन्याच्या दिव्यत्वाकडच्या प्रवास हेतूला बांधून उत्क्रांतितत्वावर झाली आहे. त्यातील 'ज्ञाता' हा जीवात्मा आहे.

ह्या जीवात्म्याची दखल व नोंद देणाऱ्या, देणाऱ्या व घेणाऱ्या व्यवस्था ह्या विश्वात ''अदृश्यतत्वाने'' पण अव्यक्तातच बांधलेल्या आहेत. पण त्या 'सत्यस्वरूपी' आहेत. ''These have cosmic Reality'' त्यांची नावे व प्रकार हे निरनिराळ्या **'गोत्र'** तत्वाने व यंत्रणेने बांधलेले आहेत. ही सर्व यंत्रणा कशी आहे त्याचे संशोधन करण्याची आवश्यकता आहे.

त्यावर आपण पुढच्या दिशाच्या अंकात विचार करणार आहोत.

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट, सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाईल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

सांगणारे खूप असतात कृती करणारे कमी.

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. विभाग)

❖ **'मराठी दिन'** – कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांचा जन्मदिन २७ फेब्रुवारी 'जागतिक मराठी दिन' म्हणून साजरा केला जातो. शाळेत हा दिवस २७ फेब्रुवारी रोजी सुट्टी असल्याने दि. २ मार्च रोजी साजरा करण्यात आला. इ. ९ वी च्या विद्यार्थ्यांनी कुसुमाग्रजांची एक कविता पाठ करून म्हटली व लिहिली. मराठी विषय शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कुसुमाग्रजांच्या साहित्याविषयी माहिती सांगितली.

❖ **'विज्ञान दिन'** – २८ फेब्रुवारी 'विज्ञान दिन' म्हणून साजरा केला जातो. शाळेत हा दिवस २८ फेब्रुवारी रोजी रविवार असल्याने दि. २ मार्च रोजी साजरा करण्यात आला. इ. ८ वी च्या विद्यार्थ्यांनी विज्ञान आणि आजची परिस्थिती या विषयी माहिती सांगितली. सौ. भट व सौ. कुमावत यांनी विद्यार्थ्यांना विज्ञानाविषयी माहिती सांगितली.

❖ मराठा मंदिर महाराष्ट्र ज्ञानपीठ तर्फे घेण्यात आलेल्या 'मराठी पाचवी' परिक्षेचा निकाल सलग तिसऱ्या वर्षीही १००% लागला आहे. या परीक्षेत कु. दर्शना जयवंत भोईर ही महाराष्ट्रातून द्वितीय क्रमाकांने उत्तीर्ण झाली.

या परीक्षेमध्ये विशेष श्रेणी ६ विद्यार्थ्यांना, प्रथम श्रेणी ८ विद्यार्थ्यांना, द्वितीय श्रेणी ४ विद्यार्थ्यांना प्राप्त झाली. मार्गदर्शक शिक्षिका सौ. संगीता तातळे यांचे व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन.

❖ १ मे महाराष्ट्र दिनानिमित्त सेवासदन कॉलेज ऑफ एज्युकेशन या ठिकाणी कार्यरत असलेल्या प्राध्यापिका सौ. संध्या सिनलकर यांना आमंत्रित केले होते. शैक्षणिक क्षेत्रा संबंधित असल्याने त्यांनी शिक्षकांबरोबर छान संवाद साधला. शिक्षक व विद्यार्थी या दोहोंमध्ये भावनिक संवाद साधून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे अतिशय आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले व या क्षेत्रात करीत असलेल्या प्रयोगांविषयी माहिती दिली.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**'नॅक' चा 'अ' दर्जा :**

''बापरे...!'' पाच वर्ष कधीच संपली. आता नॅक कमिटी येणार, देव जाणे काय काय प्रश्न विचारतील, काय तपासतील. महाविद्यालयाच्या परिसरातील स्वच्छता, नीटनेटकेपणा, आजी माजी विद्यार्थ्यांशी संबंधित प्रश्न महाविद्यालयाचे दप्तरी कामकाज, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमधील प्रगती, तसेच विद्यार्थ्यांमधील प्रगती केवळ प्रगतीच म्हणण्यापेक्षा त्यांची वेगवेगळ्या क्षेत्रातील गरुडझेप हे सर्व तपासत असताना आपण समाधानकारक उत्तरे देऊ शकणार ना? त्यांना आवश्यक व खरीखुरी माहिती पुरवून महाविद्यालयाचा दर्जा आपणास टिकवून ठेवायचा आहे. याचं टेन्शन जवळ जवळ सर्वच महाविद्यालयांना येते.

शासन नियमाप्रमाणे सर्वच महाविद्यालयांसाठी आवश्यक असणाऱ्या राष्ट्रीय मूल्यांकन समितीने बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयास दि. २१, २२ व २३ जानेवारी, २०१० रोजी भेट देण्याचे ठरले. महाविद्यालयाच्या परिसराची स्वच्छता करण्यात आली. तसेच प्रत्यक्ष महाविद्यालयाच्या इमारतींना रंगरंगोटी करण्यात आली. तसेच महाविद्यालयाचे दप्तरी रेकॉर्ड उपलब्ध करण्यात आले व तीन दिवसांकरिता येणाऱ्या

या पाहुण्यांचे भेट देण्याच्या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले.

यापूर्वी सन २००४ साली महाविद्यालयास नॅक कमिटी कडून B++ हा शेरा देण्यात आला होता. व त्यांच्या कडून काही सूचना करण्यात आल्या होत्या. त्यांचा सूक्ष्म अभ्यास करून महाविद्यालयात त्या त्या गोष्टींची सुधारणा करण्यात आली होती.

ठरल्याप्रमाणे पाहुणे दि. २१ जानेवारी, २०१० रोजी सकाळी ठिक ८.४५ वाजता महाविद्यालयाच्या गेटवर आले. तेथे महाविद्यालयातील एन.सी.सी. विभागाच्या विद्यार्थ्यांनी तसेच प्राचार्या व इतर प्राध्यापक वर्ग यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. ठीक ९.०० ते १०.०० या एक तासाच्या कालावधीत आदरणीय प्राचार्यांशी सभा झाली. महाविद्यालयाचा आय.क्यू.ए.सी. रिपोर्ट त्यांनी वाचला होता. त्यामध्ये डॉ. बेडेकर विद्या मंदिर पासून विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व महाविद्यालयांमध्ये एकूण सातशे संगणक आहेत व लिनक्स हे सॉफ्टवेअर आहे. तसेच सर्व कामकाज संगणकीकृत आहे. म्हणजेच कोणताही कर्मचारी कोणत्याही संगणकावर बसून आपले कामकाज करू शकतो. तसेच आदरणीय प्राचार्यांचे नेतृत्व व विद्यार्थ्यांना स्मार्ट कार्डनेच प्रवेश अतिथींना वेगळ्या गेटने वेगळ्या आय कार्डने प्रवेश या सर्व गोष्टींची प्रथमदर्शनी छाप पडली.

आमचे महाविद्यालय विज्ञान महाविद्यालय असल्याने विज्ञान विभागाच्या वेगवेगळ्या शाखांना ठरल्याप्रमाणे भेट दिली. महाविद्यालयाच्या वाचनालयास भेट दिली. कार्यालयास भेट दिली. प्रत्येक ठिकाणी ठरावीकच प्रश्न विचारून पण कसून चौकशी करण्याचा प्रयत्न पाहुण्यांकडून करण्यात आला. परंतु आय. क्यू. ए. सी. अहवालात नमूद केल्याप्रमाणे खरीखुरी माहिती त्यांस मिळत गेली. महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची सभा घेण्यात आली. त्या सभेत विद्यार्थ्यांस महाविद्यालयातील प्रथमोपचार, महाविद्यालयातील स्वच्छता व डागडुजी तसेच विद्यार्थ्यांची काउंटरवरील कामे व लेक्चर्स इत्यादी वेळच्या वेळी होतात का अशा प्रकारचे प्रश्न विचारण्यात आले. नेहमीच समाधानी असणाऱ्या विद्यार्थ्यांनी समाधानकारक उत्तरे दिली. आमच्या महाविद्यालयातील माजी विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रात चमकत आहेत. माजी विद्यार्थी देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाहुण्यांनी त्यांना तुम्ही महाविद्यालयात शिकत असताना योग्य सहकार्य मिळत होते का? तसेच तुम्ही महाविद्यालयातून पदवी घेऊन बाहेर पडल्यानंतर महाविद्यालयामध्ये काही प्रगती वाटते का? आता महाविद्यालयाकडून तुमच्यासाठी करण्यात येते का? माजी विद्यार्थ्यांनीदेखील समाधानकारक उत्तरे दिली.

दि. २१ जानेवारी, २०१० रोजी संध्याकाळी ठीक ५.४५ ते ६.३० या वेळात सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये गणेश वंदना, देशभक्तिपर गीते, जवळ जवळ दोनशे वर्षांपासून चालत आलेले पारंपरिक नृत्य, तसेच पंजाबी नृत्य इत्यादींचा समावेश करण्यात आला होता.

२००४ ते २००९ या पाच वर्षांच्या कालावधीत महाविद्यालयात नवनवीन अभ्यासक्रम चालू करण्यात आले आहेत. त्यामध्ये जैवतंत्रज्ञान, सूक्ष्मजीवशास्त्र, संगणकशास्त्र इत्यादींचा समावेश आहे. तसेच विद्यापीठात नंबर मिळविण्याची परंपरा विद्यार्थ्यांनी कायम टिकवून ठेवली आहे. महाविद्यालयात फ्रेंडशिप डे, मराठी दिवस, हिंदी दिवस, राष्ट्रीय सेवा योजना दिवस साजरे केले जातात. तसेच विद्यार्थ्यांच्या आनंदाची पर्वणी म्हणजे आकांक्षा फेस्टिवल. त्यामध्ये विद्यार्थ्यांना कलागुण सादर करण्यास वाव मिळतो.

महाविद्यालयाकडून दरवर्षी संयुजा हे मॅगेझिन प्रकाशित करण्यात येते. त्यामध्ये विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या कविता, लेख सादर केले जातात. महाविद्यालयातील बऱ्याच प्राध्यापकांनी डॉक्टरेट केली आहे. तर काही प्राध्यापक डॉक्टरेट करत आहेत. तसेच शिक्षकेतर कर्मचारी देखील त्यांच्या ज्ञानात भर म्हणून काही नवनवीन कोर्सेस करीत आहोत. महाविद्यालयाच्या जडणघडणीत या गोष्टी देखील महत्त्वाच्या मानल्या जातात.

महाविद्यालयातील सर्व बाबींची नियोजनबद्ध तपासणी झाल्यावर दि. २३ जानेवारी २०१० रोजी संध्याकाळी पाहुण्यांची ''एक्झिट मिटिंग'' झाली. पाहुण्यांनी महाविद्यालयातील प्रत्येक मुद्यावर आपले समाधानकारक मत व्यक्त केले व महाविद्यालयाचा निरोप घेतला.

गेल्या दोन महिने सर्वच जण निकालाची आतुरतेने वाट पहात होते. विद्या प्रसारक मंडळाने आत्ताच ७६ व्या वर्षात पदार्पण केले आहे. तर विद्या प्रसारक मंडळाचे बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय गेली ४० वर्षे समाजात अभिमानाने व स्वाभिमानाने जगत आहे. दि. २९ मार्च २०१० रोजी नॅक कमिटीकडून आलेल्या ई-मेलने महाविद्यालयाच्या प्रतिष्ठेत आणखीनच भर टाकली आहे. महाराष्ट्रातील काही ठरावीकच महाविद्यालयांना नॅक कमिटिने ''अ'' दर्जा देऊन सन्मानित केले आहे. त्यामध्ये विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचा समावेश करण्यात आला आहे. ही बातमी कळताच प्राचार्या, विद्या प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आजी माजी विद्यार्थी व हितचिंतक खूपच खुष झाले आहेत.

महाविद्यालयातील आजी माजी विद्यार्थ्यांचा उत्तरोत्तर होत असलेला विकास त्यासाठी महाविद्यालयाकडून केले जाणारे प्रयत्न, तसेच महाविद्यालयाची जडणघडण इत्यादींचे मोजमाप होणे शासनाकडून महत्वाचे मानले जाते व हे काम राष्ट्रीय मूल्यांकन समितीकडून म्हणजेच ''नॅक कमिटी'' कडून केले जाते. म्हणूनच 'नॅक' चा हा अनुभव अविस्मरणीय ठरला.

**मराठी दिवस साजरा :**

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या पतंजली या सभागृहात मराठी दिवस मोठ्या उत्साहात राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून दि. २६ फेब्रुवारी रोजी साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रख्यात साहित्यिक व जोशी बेडेकर महाविद्यालयाचे प्रा. अनिल भाबड यांना; तर प्रमुख वक्त्या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थीनी कु. सृष्टी अंकोलेकर यांना आमंत्रित केले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. बी. एस. धुमाळे यांनी केले. तर प्रा. अनिल आठवले यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. अनिल भाबड व कवयित्री कु. सृष्टी अंकोलेकर यांचा परिचय करून दिला.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मराठी दिवसावर स्वरचित व काही साहित्यिकांच्या कविता सादर केल्या तर काही विद्यार्थ्यांनी मराठी दिवसावर भाषणे केली. प्रा. प्रकाश माळी यांनी एक गाणे सादर केले. तर महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी श्री. रामचंद्र शिंदे यांनी स्वलिखित व दिग्दर्शित मराठी दिवस व राष्ट्रीय सेवा याजना यांचे महत्त्व पटवून देणारे एक लघुनाट्य सादर केले. त्यामध्ये कु. निखिल भोईर, कु. प्रशांत शिंदे व कु. श्रुती पाटील या विद्यार्थ्यांनी भाग घेतला. लघुनाट्यास प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला. तसेच श्री. रामचंद्र

शिंदे यांनी त्यांच्या स्वरचित खास मालवणी भाषेतील कविता सादर केल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. अनिल भाबड व कु. सृष्टी अंकोलेकर यांनी मराठी भाषेबद्दल असलेला आपला अभिमान व्यक्त केला. मराठी भाषिक होऊन आपण तिचा वापर करून कसे आपले व महाराष्ट्राचे नाव जगाच्या नकाशावर ठेवू शकतो. अशा आशयाचा उपदेश विद्यार्थ्यांना दिला.

शेवटी राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा. डॉ. किरण पारिया यांनी उपस्थितांचे आभार मानले. अशा प्रकारे बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या पतंजली या सभागृहात मराठी दिवस मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे निवेदन कु. वैशाली शेवडे या विद्यार्थिनिने केले. कार्यक्रमास उपप्राचार्या प्रा. सौ. मीरा अकोलकर, डॉ. सौ. मंगला बोरकर, प्रा. सौ. एम.टी. वानखेडे व श्री. मनोहर अमृतकर व जवळ जवळ दोनशे विद्यार्थी उपस्थित होते.

वृत्तलेखन – **श्री. रामचंद्र लक्ष्मण शिंदे**
लिपिक
बा.ना.बांदोडकर विज्ञान महाविद्यालय ठाणे

## विधी महाविद्यालय

❖ ठाणे विधी महाविद्यालयात पार पडलेल्या विविध परीक्षा –

| तारीख | परीक्षा |
|---|---|
| २ – ३० मार्च | प्रात्यक्षिक परीक्षा |
| २३–२९ मार्च | पूर्वतयारी परीक्षा |
| १९ एप्रिल, ३ मे | विद्यापीठ परीक्षा |

❖ समाजकल्याण मंत्रायलयाच्या परिपत्रकानुसार दि. १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त १४ तास अभ्यास विकासाचा ध्यास या शीर्षकांतर्गत ''आजचे स्पर्धात्मक युग व विद्यार्थ्यांची वाढती जबाबदारी'' या विषयावर प्रा. श्री. अनंत गद्रे यांचे व्याख्यान झाले. तसेच त्यानंतर प्रभारी प्राचार्या सौ. श्रीविद्या जयकुमार यांनी ''भारतीय संविधान व जनतेला प्राप्त सोयी सुविधा हक्क व कर्तव्ये'' या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. श्री. विनोद वाघ यांनी केले. तर प्रा. सौ. प्रज्ञा राजेबहादूर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे आभार मानले.

❖ महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या सौ. श्रीविद्या जयकुमार व प्रा. श्री. विनोद वाघ यांनी मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या या आंतराष्ट्रीय चर्चासत्रात जातनिहाय भेदभाव सकारात्मक प्रतिसाद भाग घेतला. त्यात सौ. श्रीविद्या जयकुमार यांनी 'अस्पृश्यता: मानव अधिकाराच्या दृष्टिकोनातून स्वतंत्र भारतातील कायदे' या विषयावर शोधनिबंध सादर केला.

❖ दि. १० मे रोजी महाविद्यालयाचे वार्षिक नियतकालिक 'विधिज्ञ' या नवीन नावाने मंडळाचे ज्येष्ठ सदस्य श्री. करंदीकरसर यांच्या हस्ते प्रकाशित झाले.



**महाविद्यालयाच्या वार्षिकाचे प्रकाशन करताना श्री. श्री. वि. करंदीकर, प्राचार्या सौ. श्रीविद्या जयकुमार व इतर मान्यवर**

●●●

मुखपृष्ठावरून

**संपादकीय**

**शिक्षणाचा सावळागोंधळ – शेवटाची सुरुवात**

वास्तविक सरकारने स्वत:वर घालून घ्यावयाचे निर्बंध व जबाबदाऱ्यांची जबाबदारी एवढाच या नियमांचा अर्थ असू शकतो. गेली हजारो वर्षे भारतातच नव्हे तर सबंध जगात राजाने, राज्यकर्त्यांनी घटनेचा अधिकार दिला, म्हणून लोक शिकत नाहीत. रानटी अवस्थेपासून समाज सभ्यतेकडे प्रवास करू लागला, तेव्हाच त्याच्या सामाजिक व ज्ञानवितरणाच्या रचनेची सुरुवात झाली.

आणि म्हणूनच 'घटनेने' शिक्षणाचा अधिकार दिला, असे म्हणण्यातून सरंजामी व गुलामी प्रवृत्तींचे प्रदर्शन होते. कुठल्याही भारतीय नागरिकाला शिक्षणाचा अधिकार हा राजकीय घटनेमुळे प्राप्त झालेला नसून तो त्याचा जन्मसिद्ध अधिकार आहे. आजवर जे लोक शिक्षित झाले ते या जन्मसिद्ध अधिकारांचा एक भाग म्हणून झाले. याबाबतीत सरकारने कितीही बढाया मारल्या तरी आजच्या शिक्षण वितरण व्यवस्थेमधील गोंधळ व दिवाळखोरी ही सरकारी हस्तक्षेपामुळेच होत आहे.

सर्व शिक्षा अभियानामधील कोटच्यवधींचा भ्रष्टाचार, महापालिका ते केंद्र शाळांपर्यंत असणारी भयावह परिस्थिती डोळ्यांसमोर असताना सरकारचा हा नवा हस्तक्षेप म्हणजे या मूलभूत अधिकारवरील गदा आहे. आठवीपर्यंतच्या मुलांची परीक्षा न घेण्याच्या सारखे सवंग लोकप्रियता मिळवण्यासाठी घेतलेले निर्णय ही भावी पिढ्यांची शिक्षण क्षमता खच्ची करण्याची सुरुवात आहे. परीक्षा पद्धतीत आलेल्या अपप्रवृत्तींवर उपाय सुचवणे व परीक्षा पद्धतच काढून टाकणे या दोन गोष्टी भिन्न आहेत. शिवाय या सर्व शिक्षणप्रक्रियेत आहार योजना, गणवेश, शुल्क आदी पूरक आनुषंगिक बाबी आणि प्रत्यक्षात दिले जाणारे शिक्षण यांतही गोंधळ घातला जात आहे. शिक्षण म्हणजे चार भिंतींच्या आत दिले जाते तेवढेच, असा मर्यादित विचार केला जात आहे.

थोडक्यात, ब्रिटिशांनी केले नाही, इतके शिक्षणाचे नुकसान स्वतंत्र भारतातील सरकार करत आहे. वृत्तपत्रांतील लिखाणातून व्यक्त होणारी तथाकथित शिक्षणतज्ज्ञांची यावरील मते ही तर करमणूक करणारीच आहेत. येऊ घातलेली ही परीक्षारहित शिक्षण पद्धती पाश्चात्त्य देशांमध्ये याआधी केल्या गेलेल्या प्रयोगांची नक्कल आहे. ज्या इंग्लंड, अमेरिकेतील पद्धतीची आपण नक्कल करू पाहात आहोत, तेथील शिक्षणतज्ज्ञांचे अहवाल जरी आपल्या लोकांनी वाचले तरी त्यांच्या पद्धतीतील अपयशाची कारणे आपल्याला समजू शकतील. विद्यार्थी संख्या, विद्यार्थी शिक्षक यांचे प्रमाण, शैक्षणिक साहित्याची मुबलक रेलचेल असूनही त्यांची शिक्षण पद्धती आज संपूर्णपणे अयशस्वी ठरली आहे. यामागील कारणमीमांसेचा विचार तेथे चालू झाला आहे. या अपयशामागली एक महत्त्वाचे कारण म्हणजे तेथील मोडकळीस आलेली कुटुंब व्यवस्था हे आहे. माध्यमे, कमालीचा उपभोक्तावाद, आत्मकेंद्रित जीवनशैलीमुळे झालेला सर्वच नात्यांचा संकोच, लैंगिक स्वैराचार, नट, नट्या, कलाकार, सामाजिक नेतृत्व या सर्वांची स्वैराचारी वागणूक या सर्व बाबी यामागे असल्याचे अनेक शैक्षणिक अहवालांतून नमूद झाले आहे. यांतील अनेक विकसित देशांत तथाकथित घटनेचा अधिकार वगैरे नसूनही शिक्षण सार्वत्रिकता आहे.

दुर्दैवाने पाश्चात्त्यांच्या उपरोक्त सर्व अवगुणांची नक्कल आपण हिरीरीने करत आहोत. आपली न्यायालयेही त्यावर शिक्कामोर्तब करीत आहेत. या पार्श्वभूमीवर हे नवीन विधेयक ही शुद्ध राजकीय फसवणूक असून निदान काही सूज्ञ पालक व विचारवंतांनी याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

●●●

# ज्ञानगंगा प्रवाहित करण्यासाठी

'दुर्लभं भारते जन्म।' भारतात जन्माला येणे दुर्लभ आहे. ज्यांचा जन्म या देशात झालेला आहे ते भाग्यवान होत. 'भा' म्हणजे प्रकाश. हा ज्ञानाचा पर्यायी शब्द आहे. ज्ञानात रत म्हणजे मग्न असणारे. ज्ञान प्राप्ती हेच ध्येय. कारण ज्ञानाशिवाय मनाला शुद्ध, निर्मळ, पवित्र करणारे दुसरे साधन नाही.' न हि ज्ञानेन सदृशं पवित्रं इह विद्यते। ज्ञाना व्यतिरिक्त इतर अनेक गोष्टी केल्या तरी मोक्षप्राप्ती होऊ शकत नाही. 'ज्ञानात् एव तु कैवल्यम्।' आचार्य म्हणतात, 'ज्ञान विहीने सर्व मनेन मुक्तिर्न भवति जन्मशतेन।' अशी ज्ञानाची महती असल्याने, पवित्र होण्यासाठी ज्ञानप्राप्ती आवश्यक आहे.

भारत केवळ भोगभूमी नाही. ही कर्मभूमी आहे. 'नर करणी करे तो नारायण बन जाय।' ही केवळ म्हण नाही. हा अनुभव आपल्या जीवनात घेणारे हजारो साधक होऊन गेले व सांप्रतही प्रयत्नशील साधक आहेत.

आपल्या पूर्वजांनी म्हणजे ऋषिमुनींनी, साधुसंतांनी हाडांची काडे करून ज्ञान प्राप्ती करून घेतली. प्रसंगी फकीरी पत्करली. मात्र ज्ञानप्राप्तीचा मार्ग सोडला नाही. त्यांनी आपल्या जीवनात जे प्रयोग केले आणि ज्ञान प्राप्त करून घेतले ते ज्ञान ग्रंथरूपाने आज आम्हांला उपलब्ध झाले आहे. ते जतन करणे, त्याचे संशोधन करणे, आपल्या जीवनात त्या वाङमयाला स्थान देणे आवश्यक आहे. तरच खऱ्या अर्थाने भारत दर्शन आम्हांला घडेल.

आमच्या दुर्दैवामुळे आम्ही त्याला पारखे झालो व बाह्य परिस्थितीचे गुलाम झालो. आज सुदैवाने पुनरपि भारत 'स्वराट्' झाला आहे. आता हा विचार तीव्रतेने, कसोशीने करणे आवश्यक आहे. भारत ज्ञानी लोकांचा देश आहे. ज्ञानासाठी संपूर्ण जीवन झिजविणाऱ्यांचा देश आहे. म्हणून ही गोष्ट पुनरपि स्थापित करण्यासाठी अथक परिश्रमाची आवश्यकता आहे.


प्राचीन वाङमय, जे वेद याचा वारसा भारतीयांना प्राप्त झाला आहे. त्याचे पुनरुज्जीवन करण्यासाठी भारत सरकारने वेद वाङमय संशोधन करण्यासाठी विद्वत् जनांना उत्तेजना दिले पाहिजे. त्यासाठी 'वेद वाङमय संशोधन मंडळ' याची स्थापना करून वेद, वेदांगे, उपवेद, संहिता, ब्राह्मणे, आरण्यके, उपनिषदे, स्मृति ग्रंथ – ''श्रोत, गृहा व धर्म सूत्रे' आदींचा वेध घेऊन हे वाङमय पुनरुज्जीवित केलेल्या आचार्यांची ग्रंथ संपदा तसेच भक्तिमार्गाचा अवलंब करून संपूर्ण भारतात संत वाङमय जे निर्माण झाले त्याचा समावेश करून आधुनिक विचारवंतांनी विशेषत: रामकृष्ण, विवेकानंद, स्वामी रामतीर्थ, रमण महर्षी, योगी अरविंद आदि महत्म्यांनी वेद वाङमय विस्तारासाठी आपल्या आचरणाने व वाङमयाने भर टाकली आहे. या सर्वांचा विचार या संशोधन मंडळाकडून होणे अगत्याचे आहे.

हे झाल्यानंतर भारताव्यतिरिक्त देशात जे काही धर्म विचार आहेत, त्यांचाही परामर्श घेणे योग्य ठरेल. त्यातून तौलनिक स्थिती लक्षात येण्यास मदत होईल.

स्वतंत्र भारतात पुनरपि ही ज्ञानाची गंगा प्रवाहित करण्यासाठी भारतीयाने जीवापाड श्रम केले पाहिजेत. भारताचे खरे दर्शन घडविण्याचे उत्तरदायित्व भारत सरकारने विद्वत् जनांसह स्वीकारावे तरच भारत हा जगात आपले पूर्व वैभव प्रस्थापित करू शकेल. हा विषय भारताने समजून घेतला पाहिजे आपली संस्कृती ही निरंतरपणे व्यवहारात आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची मानसिक तयारी दाखवावी. तरच, भारत तेजस्वी जीवन जगून सर्व विश्वात सुख शांतता सौहार्द, सर्व कल्याण सदाचा साधू शकेल.

**– शंकरराव मठ**

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006



# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## संपर्क

कार्यवाह
विद्या प्रसारक मंडळ
विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टर्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.